RNI No. MAHBIL /2009/31732

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष १२, अंक ३] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर १२-१८, २०२६/कार्तिक २१-२७, शके १९४८ [पृष्ठे १३३, किंमत : रुपये ९.००

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ नोव्हेंबर २०२६.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक एनपीएस-२०२३/प्र.क्र.५५/सेवा-४.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत उपदानाच्या प्रदानाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेः-

### प्रकरण एक

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.** – (१) या नियमांस, महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत उपदानाचे प्रदान) नियम, २०२६ असे म्हणावे.

(२) ते, महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. प्रयुक्ती.-** या नियमांत, अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज, हे नियम, १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्याच्या कामकाजाशी संबंधित असणाऱ्या नागरी सेवा व पदांवर कायम नियुक्ती केलेल्या आणि ज्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६ लागू आहेत, अशा शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असतीलः

परंतु, सेवेत असताना मृत्यू पावलेल्या किंवा अपंगत्वामुळे सेवेतून मुक्त झालेल्या किंवा असमर्थतेमुळे सेवानिवृत्त झालेल्या आणि ज्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ अंतर्गत लाभ घेण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६ च्या नियम १० अन्वये विकल्प निवडला होता, अशा शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत, उपदानाची रक्कम महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ या नियमांस अनुसरून दिली जाऊ शकेल.

**३. व्याख्या.-** (१) या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(क) "लेखा अधिकारी" याचा अर्थ, ज्याचे शासकीय पद कोणतेही असले तरी, जो लेख्यांच्या विभागीयकरणाच्या योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या विभागाच्या, इतर बाबींबरोबरच, राज्य शासनाच्या कार्यालयाच्या किंवा विभागाच्या जमा रकमा, प्रदाने, अंतर्गत लेखापरीक्षा आणि लेखांकन कार्यांसाठी देखील जबाबदार असतो असा अधिकारी, असा आहे आणि यामध्ये राज्य शासनाचे लेखे किंवा लेख्यांचे भाग ठेवण्याचे कार्य ज्यांच्याकडे सोपविलेले आहे अशा महालेखापालांच्या अधिनस्थ अधिकाऱ्यांचा त्यात समावेश होतो;

(ख) "वाटपग्राही" याचा अर्थ, ज्याला अनुज्ञप्ती शुल्क भरून किंवा अन्य प्रकारे शासकीय निवासस्थानाचे वाटप करण्यात आले आहे असा शासकीय कर्मचारी, असा आहे;

(ग) "वित्तलब्धी" याचा अर्थ, नियम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वित्तलब्धी, असा आहे;

(घ) "नमुना" याचा अर्थ, या नियमांस जोडलेला नमुना, असा आहे;

(ङ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(च) "शासकीय देय रकमा" याचा अर्थ, नियम ४५ च्या पोट-नियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेली देयके, असा आहे;

(छ) "उपदान" यामध्ये नियमांअन्वये देय असलेले सेवानिवृत्ती उपदान आणि मृत्यू उपदान याचा समावेश आहे;

(ज) "अल्पवयीन" याचा अर्थ, जिने वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली नाहीत अशी व्यक्ती, असा आहे;

(झ) "अर्हताकारी सेवा" याचा अर्थ, या नियमांनुसार अनुज्ञेय उपदानाच्या देयकासाठी विचारात घेतली जाईल, अशी कर्तव्यावर असताना किंवा अन्यथा केलेली सेवा, असा आहे;

(ञ) "निवृत्तिवेतनार्ह वेतन" म्हणजे, शासकीय कर्मचाऱ्याने, शेवटच्या दहा महिन्यांच्या सेवेमध्ये अर्जित केलेले सरासरी वेतन किंवा ज्या पदावरुन शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाला आहे, त्या पदाकरिता निश्चित केलेले मूळ वेतन, यापैकी जे शासकीय कर्मचाऱ्यास अधिक फायदेशीर असेल ते वेतन :

परंतु, कोणताही प्रोत्साहनपर वित्तीय लाभ, शासनाच्या धोरणानुसार देण्यात आलेल्या एकस्तर पदोन्नतीमुळे वेतनातील फरकासह (कालबध्द पदोन्नती योजना किंवा आश्वासित प्रगती योजना वगळता), निवृत्तिवेतनार्ह वेतनाची परिगणना करण्यासाठी अनुज्ञेय असणार नाही.

(ट) "सेवा पुस्तक" यामध्ये, सेवा पट, असल्यास समावेश होईल.

(२) यात वापरलेले व व्याख्या न केलेले, परंतु, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ व महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६, यांमध्ये व्याख्या केलेल्या शब्द व शब्दप्रयोग यांना, अनुक्रमे, या अधिनियमांमध्ये किंवा नियमांमध्ये किंवा विनियमांमध्ये जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

## प्रकरण दोन

## सर्वसाधारण शर्ती

**४. उपदानाच्या मागण्यांचे विनियमन.**- (१) उपदानाबाबतची कोणतीही मागणी ही, ज्यावेळी शासकीय कर्मचारी यथास्थिति सेवानिवृत्त होतो किंवा त्यास सेवानिवृत्त किंवा कार्यमुक्त केले जाते किंवा तो मृत्यू पावतो त्यावेळी अंमलात असलेल्या या नियमांच्या तरतुदीनुसार विनियमित केली जाईल.

(२) शासकीय कर्मचारी यथास्थिति ज्या दिवशी सेवानिवृत्त होतो, किंवा त्यास सेवानिवृत्त किंवा कार्यमुक्त केले जाते तो दिवस त्याचा शेवटचा कामाचा दिवस म्हणून मानण्यात येईल. मृत्यूची तारीख देखील कामाचा दिवस म्हणून मानण्यात येईल.

**५. उपदान रोखून ठेवण्याचा शासनाचा अधिकार.**- (१) जर शासकीय कर्मचारी सेवेत असताना सुरु केलेल्या कोणत्याही विभागीय किंवा न्यायालयीन कार्यवाहीमध्ये सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी गंभीर गैरवर्तन किंवा निष्काळजीपणाबद्दल अपराधी आढळल्यास, शासनाला झालेल्या कोणत्याही आर्थिक नुकसानीची संपूर्ण किंवा अंशतः वसुली उपदानातून करण्याचे आदेश देण्याचा अधिकार शासन स्वतःकडे राखून ठेवते.

मात्र, या संबंधात कोणतेही अंतिम आदेश काढण्यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करण्यात येईल:

(२) (क) पोट-नियम (१) मध्ये उल्लेखिलेली विभागीय कार्यवाही, शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीनंतर, या नियमाखालील कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि शासकीय कर्मचारी सेवेत राहिला असता तर, ज्या पध्दतीने ती चालू ठेवण्यात आली असेल त्याच पध्दतीने ती, ज्या प्राधिकरणाने सुरू केली त्याच्याचकडून चालू ठेवली जाईल व समाप्त केली जाईल.

(ख) पोट-नियम (१) मध्ये निर्देशित केलेल्या विभागीय किंवा न्यायालयीन कार्यवाही पूर्ण होईपर्यंत आणि त्यासंबंधातील अंतिम आदेश दिले जाईपर्यंत शासकीय कर्मचाऱ्याला उपदान प्रदेय असणार नाही.

(३) शासन, कोणत्याही वेळी, स्वतःहून किंवा अन्य प्रकारे कोणत्याही चौकशीची कागदपत्रे मागवून या नियमांनुसार दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पुनर्विलोकन करू शकेल आणि तो आदेश कायम ठेवू शकेल, त्यात बदल करू शकेल किंवा तो रद्द करू शकेल, किंवा प्रकरणाच्या परिस्थितीनुसार उचित वाटेल त्याप्रमाणे अशी पुढील चौकशी करण्याचे निर्देश देऊन ते प्रकरण एखाद्या प्राधिकरणाकडे परत पाठवू शकेल, किंवा त्याला योग्य वाटेल असा अन्य कोणताही आदेश पारित करू शकेल:

परंतु, रोखून धरण्यात येणाऱ्या किंवा काढून घेण्यात येणाऱ्या उपदानाच्या रकमेत वाढ करणारा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(४) शासन, कोणत्याही वेळी, स्वतःहून किंवा अन्य प्रकारे, या नियमांनुसार पारित केलेल्या कोणत्याही आदेशाचे, पुनर्विलोकन करणे आवश्यक ठरेल अशी अपवादात्मक किंवा विशेष परिस्थिती अस्तित्वात असेल किंवा जेव्हा पुनर्विलोकनाधीन आदेश पारित करताना सादर करता येऊ शकली नाही किंवा उपलब्ध होऊ शकली नाही अशी कोणतीही नवीन सामग्री किंवा पुरावा, जे प्रकरणाचे स्वरूप बदलण्यावर परिणामकारक ठरत आहे असे त्याच्या निदर्शनास आले आहे, किंवा आणण्यात आले आहे, त्याचे पुनर्विलोकन करू शकेल:

परंतु, रोखून धरण्यात येणाऱ्या किंवा काढून घेण्यात येणाऱ्या उपदानाच्या रकमेत वाढ करणारा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(५) या नियमाच्या प्रयोजनार्थ, -

(क) शासकीय कर्मचाऱ्यास किंवा निवृत्तिवेतनधारकास ज्या तारखेला आरोपपत्र देण्यात आले असेल त्या तारखेस, किंवा शासकीय कर्मचाऱ्याला आधीच्या ज्या तारखेपासून निलंबनाधीन ठेवले असेल अशा तारखेस, विभागीय कार्यवाही सुरु केली असल्याचे मानण्यात येईल.

(ख) न्यायिक कार्यवाही—

(एक) फौजदारी कार्यवाहीच्या बाबतीत, दंडाधिकारी जिची दखल घेतो अशी तक्रार किंवा प्रतिवेदन पोलीस अधिकाऱ्याने ज्या तारखेस दाखल केले असेल त्या तारखेस सुरु केली असल्याचे मानण्यात येईल, आणि

(दोन) दिवाणी कार्यवाहीच्या बाबतीत, वादपत्र न्यायालयाला ज्या तारखेस सादर करण्यात येईल त्या तारखेस सुरु केली असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण तीन

## वित्तलब्धी

६. **वित्तलब्धी**.-(१) राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत, उपदानाची रक्कम निर्धारित करण्याच्या प्रयोजनासाठी, 'वित्तलब्धी' या संज्ञेत, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ याच्या नियम ९ (३६) (एक) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे शासकीय कर्मचारी त्याच्या सेवानिवृत्तीच्या लगतपूर्वी किंवा त्याच्या मृत्यूच्या तारखेला घेत असलेल्या मूळ वेतनाचा समावेश होईल.

**स्पष्टीकरण**.- या पोट-नियमाच्या प्रयोजनार्थ, उपदानाच्या परिगणनेसाठी गतिरोध वेतनवाढ, वित्तलब्धी म्हणून समजण्यात येईल.

(२) जेव्हा एखादा शासकीय कर्मचारी, सेवेत असताना त्याच्या सेवानिवृत्तीच्या किंवा मृत्यूच्या तात्काळ आधी, कर्तव्यावर गैरहजर राहिला असेल किंवा ज्यासाठी रजा वेतन देय आहे अशा रजेवर असेल किंवा

निलंबित करण्यात आल्यानंतर त्याची सेवा न गमावता पुनर्नियुक्ती करण्यात आली असेल, तर तो कर्तव्यावर गैरहजर किंवा निलंबित नसता तर त्याला जी वित्तलब्धी मिळाली असती, तीच या नियमाच्या प्रयोजनासाठी वित्तलब्धी म्हणून मानली जाईलः

परंतु, पोट-नियम (५) मध्ये निर्देशिलेल्या वेतनवाढीव्यतिरिक्त इतर कोणतीही वाढ जी प्रत्यक्षात काढली गेली नाही ती त्याच्या वित्तलब्धीचा भाग बनणार नाही.

(३) जेव्हा एखादा शासकीय कर्मचारी, सेवेत असताना सेवानिवृत्ती किंवा मृत्यू होण्यापूर्वी, प्रभारी किंवा तात्पुरत्या स्वरूपात उच्च पद धारण केल्यानंतर, ज्यासाठी रजा वेतन देय आहे अशा रजेवर गेला असेल तर अशा उच्च पदावरील वेतनाचा लाभ केवळ तेव्हाच दिला जाईल, जेव्हा असे प्रमाणित केले जाईल की, तो कर्मचारी रजेवर गेला नसता तर त्या उच्च पदावर कार्यरत राहिला असता.

(४) जेव्हा एखादा शासकीय कर्मचारी त्याच्या सेवानिवृत्तीपूर्वी किंवा सेवेत असताना मृत्यू होण्यापूर्वी, असाधारण रजेवर असल्यामुळे कर्तव्यावर अनुपस्थित असेल किंवा निलंबित असेल, त्या कालावधीची सेवा म्हणून गणना होत नसेल, तर अशा रजेवर जाण्यापूर्वी किंवा निलंबित होण्यापूर्वी त्याने घेतलेली वित्तलब्धी ही या नियमाच्या प्रयोजनासाठी वित्तलब्धी मानली जाईल.

(५) जेव्हा एखादा शासकीय कर्मचारी त्याच्या सेवानिवृत्तीच्या किंवा मृत्यूच्या लगतपूर्वी, सेवेत असताना, अर्जित रजेवर होता, आणि त्यास वेतनवाढ मिळाली जी रोखली गेली नाही, अशी वेतनवाढ जरी प्रत्यक्षात घेतली गेली नसली तरी, ती त्याच्या वित्तलब्धीचा भाग असेल.

(६) शासकीय कर्मचारी राज्य शासनाच्या दुसऱ्या विभागात प्रतिनियुक्तीवर असताना घेतलेले वेतन हे वित्तलब्धी म्हणून समजण्यात येईल.

(७) शासकीय कर्मचाऱ्याने स्वीयेत्तर सेवेत असताना घेतलेले वेतन हे वित्तलब्धी म्हणून मानली जाणार नाही, आणि तो स्वीयेत्तर सेवेत नसता तर शासनाकडून त्याला जे वेतन मिळाले असते, तेच केवळ वित्तलब्धी म्हणून गणण्यात येईल.

## प्रकरण चार

## अर्हताकारी सेवा

७. **अर्हताकारी सेवेचा प्रारंभ**. – या नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, शासकीय कर्मचाऱ्याची अर्हताकारी सेवा, त्याची ज्या पदावर कायमपणे किंवा स्थानापन्न किंवा तात्पुरती या नात्याने नेमणूक प्रथम केली असेल त्या पदाचा कार्यभार तो ज्या तारखेस घेईल, त्या तारखेपासून सुरु होईलः

परंतु, स्थानापन्न किंवा तात्पुरत्या सेवेनंतर, त्याच पदावर किंवा दुसऱ्या सेवेत किंवा पदावर कोणताही सेवाखंड न देता नियुक्ती देण्यात आलेली असावी.

८. **अर्हताकारी सेवेच्या शर्ती**. – (१) शासकीय कर्मचाऱ्याची कर्तव्ये आणि वेतन, शासनाकडून अथवा शासनाने निर्धारित केलेल्या शर्तीनुसार विनियमित होत नसतील तर, त्याची सेवा अर्हताकारी ठरणार नाही.

*स्पष्टीकरण* – या पोट-नियमाच्या प्रयोजनासाठी "सेवा" म्हणजे, शासनाच्या नियंत्रणाखालील तसेच ज्या सेवेबद्दलचे वेतन राज्याच्या एकत्रित निधीमधून किंवा शासनाकडून नियंत्रित होणाऱ्या एखाद्या स्थानिक निधीमधून देण्यात येते अशी सेवा.

(२) हे नियम लागू असलेल्या सेवेमध्ये अथवा पदावर कायमची बदली झालेल्या राज्य शासनाच्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत, त्याने राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली, स्थानापन्न अथवा तात्पुरती या नात्याने केलेल्या कोणत्याही संतत सेवेनंतर, त्या सेवेत खंड न पडता त्याची कायम पदावर नेमणूक झाल्यास त्याची ती सेवा, किंवा त्या शासनाच्या नियंत्रणाखाली यथास्थिती स्थानापन्न अथवा तात्पुरती या नात्याने केलेली संतत सेवा, अर्हताकारी ठरेल.

९. **परिवीक्षाधीन कालावधीतील सेवा हिशोबात घेणे**. – एखाद्या पदावरील परिवीक्षाधीन सेवा त्याच पदावर अथवा दुसऱ्या पदावर स्थायीकरण झाल्यास, अर्हताकारी ठरेल.

१०. **शिकाऊ उमेदवार म्हणून केलेली सेवा हिशोबात न घेणे**. – शिकाऊ उमेदवार म्हणून केलेली सेवा अर्हताकारी ठरणार नाही, परंतु शासकीय मुद्रणालयात शिकाऊ उमेदवार म्हणून केलेली सेवा याला अपवाद असेल.

११. **रजेवर घालवलेला कालावधी हिशोबात घेणे**. – सेवेच्या कालावधीतील रजा वेतन प्रदेय असणाऱ्या सर्व रजा आणि वैद्यकीय प्रमाणपत्रानुसार मंजूर करण्यात आलेल्या सर्व असाधारण रजा अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात घेतल्या जातील.

१२. **प्रशिक्षणासाठी व्यतीत केलेला कालावधी हिशोबात घेणे**. – शासकीय कर्मचाऱ्याने, शासनाच्या नियंत्रणाखाली त्याची नियुक्ती होण्याच्या लगतपूर्वी प्रशिक्षणाकरिता व्यतीत केलेला कालावधी अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात घेण्यात येईल किंवा कसे हे, शासन आदेशाद्वारे ठरवू शकेल.

१३. **निलंबनाचे कालावधी हिशोबात घेणे**. – निलंबनाधीन शासकीय कर्मचाऱ्याने वर्तणुकीबद्दलची चौकशी प्रलंबित असताना व्यतीत केलेला कालावधी, अशा चौकशीअंती तो पूर्णपणे निर्दोषी ठरला तर किंवा त्याच्यावर किरकोळ दंड आकारला गेला असेल किंवा त्याचे निलंबन पूर्णतया असमर्थनीय ठरले तर, अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात घेण्यात येईल. इतर प्रकरणी, अशा प्रकरणांना लागू होणाऱ्या नियमानुसार आदेश काढणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याने तो जाहीर करील तेवढया मर्यादेपर्यंत, ती सेवा हिशोबात घेण्यात यावी असे त्यावेळी स्पष्टपणे सांगितल्याखेरीज, निलंबनाचा कालावधी हिशोबात घेतला जाणार नाही.

१४. **बडतर्फीनंतर किंवा सेवेतून काढून टाकल्यानंतर सेवेचा हक्क गमावणे**. – एखाद्या सेवेमधून अथवा पदावरुन बडतर्फ केल्यामुळे किंवा काढून टाकल्यामुळे शासकीय कर्मचारी आपल्या पूर्वीच्या सेवेचा हक्क गमावतो.

१५. **पुन्हा सेवेत घेतल्यानंतर पूर्वीची सेवा हिशोबात घेणे**. – (१) सेवेमधून बडतर्फ केलेल्या, काढून टाकलेल्या किंवा सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या परंतु अपिलानंतर किंवा पुनर्विलोकनानंतर पुन्हा सेवेत घेतलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला त्याची पूर्वीची सेवा अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात घेण्याचा हक्क असेल.

(२) यथास्थिती बडतर्फीची, सेवेतून काढून टाकल्याची किंवा सक्तीच्या सेवानिवृत्तिची तारीख आणि पुन्हा सेवेत घेतल्याची तारीख, यांच्या दरम्यानचा खंडित सेवेचा कालावधी आणि असल्यास, निलंबनाचा कोणताही कालावधी, पुन्हा सेवेत घेण्याचा आदेश देणाऱ्या अधिकाऱ्याच्या विशिष्ट आदेशाद्वारे, कर्तव्यार्थ कालावधी अथवा रजा म्हणून नियमित केलेला नसेल तर तो, अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात घेतला जाणार नाही.

१६. **राजीनामा दिल्यानंतर सेवेचा हक्क गमावणे**. – (१) एखाद्या सेवेचा किंवा पदाचा राजीनामा दिल्यामुळे, नियुक्ती प्राधिकाऱ्याने लोक हिताच्या दृष्टीने तो मागे घेण्यास परवानगी दिली नसल्यास, पूर्वीचा सेवेचा हक्क गमावला जातो.

(२) शासनाकडील ज्या स्थायी किंवा अस्थायी नियुक्तीवरील सेवा अर्हताकारी ठरते अशी नियुक्ती स्वीकारण्याकरिता योग्य परवानगी घेऊन राजीनामा सादर केलेला असेल तर राजीनामा दिल्यामुळे पूर्वीच्या सेवेवरील हक्क गमवावा लागणार नाही.

(३) पोट-नियम (२) खाली येणाऱ्या प्रकरणात, वेगवेगळया ठिकाणी झालेल्या दोन नियुक्तींमुळे बदलीच्या नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या पदग्रहण अवधीहून अधिक नसलेला सेवेतील खंड, शासकीय कर्मचाऱ्याला कार्यमुक्त केल्याच्या तारखेस देय असलेली कोणतीही रजा मंजूर करुन किंवा त्याला देय असलेल्या रजेत न बसणारा कालावधी रीतसर क्षमापित करुन, भरुन काढण्यात येईल.

(४) जेव्हा महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६ लागू असणाऱ्या एखाद्या व्यक्तीला पुन्हा सेवेत घेण्यास आणि कामावर रुजू होण्यास परवानगी देणारा आदेश नियुक्ती प्राधिकाऱ्याने काढला असेल तेव्हा, त्या आदेशामध्ये खंडित सेवावधी क्षमापित करण्याचा अंतर्भाव असल्याचे मानण्यात येईल. परंतु खंडित सेवावधी हा अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात घेतला जाणार नाही.

(५) **नियम ३१** च्या प्रयोजनार्थ सादर केलेला राजीनामा शासनाअंतर्गत मागील सेवेच्या हक्क गमाविण्यास कारणीभूत ठरणार नाही.

**१७. सेवेत खंड पडण्याचा परिणाम**. – (१) पुढील प्रकरणे खेरीजकरुन अन्य प्रकरणी, शासकीय कर्मचाऱ्याला, सेवेत खंड पडल्यामुळे आपल्या मागील सेवेवरील हक्क गमवावा लागेल:-

(क) अधिकृत रजेवरील अनुपस्थिती;

(ख) अनुपस्थित व्यक्तीने धारण केलेले पद कायमपणे भरण्यात येईपर्यंत, अधिकृत रजेवरील अनुपस्थितीला जोडून असलेली अनधिकृत अनुपस्थिती;

(ग) निलंबनाच्या लगतनंतर, त्याच पदावर असो वा अन्य पदावर असो, पुन्हा सेवेत घेण्यात आले असेल असे निलंबन, किंवा ज्या प्रकरणी शासकीय कर्मचारी निलंबनाधीन असताना मरण पावला असेल किंवा त्याला सेवानिवृत्त होण्याची परवानगी देण्यात आली असेल अथवा नियत वयमानावर तो सेवानिवृत्त झाला असेल असे निलंबन;

(घ) सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशानुसार शासनाच्या नियंत्रणाखालील एखाद्या आस्थापनेत अनर्हताकारी सेवेमध्ये लोकहिताच्या दृष्टीने बदली करण्यात आली असेल तर, अशी बदली;

(ङ) एका पदावरुन दुसऱ्या पदावर बदली झाल्यानंतरचा पदग्रहण अवधी.

(२) पोट-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नियुक्ती प्राधिकारी रजेशिवाय असलेले अनुपस्थितीचे कालावधी, आदेशाद्वारे भूतलक्षी प्रभावाने असाधारण रजेत परिवर्तित करु शकेल.

**१८. सेवेतील खंड क्षमापित करणे**. – (१) नियुक्ति प्राधिकारी आदेशाद्वारे शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवेतील खंड क्षमापित करु शकेल:

मात्र,-

(क) असे खंड शासकीय कर्मचाऱ्याच्या आटोक्याबाहेरील कारणांमुळे पडलेले असले पाहिजेत;

(ख) जिच्या संबंधातील सेवानिवृत्ति लाभ गमावले जातील अशी एकूण सेवा, कोणतेही एक किंवा दोन खंड असल्यास ते वगळता पाच वर्षापेक्षा कमी असता कामा नये; आणि

(ग) सेवेत दोन किंवा अधिक खंड पडलेले असतील तर, अशा खंडांचा एकूण कालावधी एक वर्षापेक्षा अधिक असता कामा नये.

(२) पोट-नियम (१) खाली क्षमापित केलेल्या खंडाचा कालावधी अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात घेतला जाणार नाही.

(३) सेवापुस्तकामध्ये यापेक्षा वेगळा असा स्पष्ट उल्लेख नसेल तर, शासकीय कर्मचाऱ्याने शासनाच्या नियंत्रणाखाली केलेल्या नागरी सेवेच्या दोन कालावधीमधील खंड आपोआप क्षमापित केल्याचे मानण्यात येईल आणि असा खंड पडण्यापूर्वीची सेवा अर्हताकारी सेवा असल्याचे मानण्यात येईल.

(४) राजीनामा दिल्यामुळे, बडतर्फ केल्यामुळे अथवा सेवेतून काढून टाकल्यामुळे अथवा संपात भाग घेतल्यामुळे सेवेत पडलेल्या खंडाला पोट-नियम (३) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(५) पोट-नियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेला खंडाचा कालावधी अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात घेतला जाणार नाही.

**१९. प्रतिनियुक्तीचा कालावधी**.- शासकीय कर्मचाऱ्याने भारतातील किंवा परदेशातील स्वीयेत्तर सेवेत किंवा संयुक्त राष्ट्र किंवा इतर आंतरराष्ट्रीय संघटनांमधील प्रतिनियुक्तीवर केलेली सेवा उपदानासाठी अर्हताकारी म्हणून गृहीत धरली जाईल. तथापि, अशा कालावधीसाठी उपदानाबाबतचे अंशदान एक तर संबंधित शासकीय कर्मचाऱ्याने स्वतः किंवा विदेश नियोक्त्याने जमा केलेले असले पाहिजे.

**स्पष्टीकरण**.- या नियमाच्या प्रयोजनांसाठी, उपदान मंजुरीच्या प्रयोजनाकरिता अर्हकारी सेवा म्हणून कालावधी मोजण्यासाठी अंशदानाचा दर हा वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार विनियमित करण्यात येईल.

**२०. अठरा वर्षांच्या सेवेनंतर आणि सेवानिवृत्तीच्या पाच वर्षे पूर्वी अर्हकारी सेवेची पडताळणी**. – (१)शासकीय कर्मचाऱ्याने अठरा वर्षांची सेवा पूर्ण केल्यावर प्रत्येक प्रसंगी आणि नियत वयमानानुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी त्याची पाच वर्षांची सेवा शिल्लक असताना, कार्यालय प्रमुख, लेखापरीक्षा अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या नियमांनुसार, अशा शासकीय कर्मचाऱ्याने केलेल्या सेवेची पडताळणी करील, अर्हताकारी सेवा निश्चित करील आणि अशा प्रकारे निश्चित केलेला अर्हताकारी सेवेचा कालावधी नमुना १ मध्ये त्याला कळवील.

(२) पोट-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याची बदली तात्पुरत्या विभागातून दुसऱ्या विभागात होते, किंवा तो पूर्वी सेवा बजावत असलेला विभाग बंद झाल्यामुळे किंवा त्याचे पद अतिरिक्त असल्याचे घोषित केल्यामुळे होते, तेव्हा त्याच्या सेवेची पडताळणी अशी घटना घडेल तेव्हा केली जाईल.

(३) पोट-नियम (१) व (२) अन्वये केलेली पडताळणी ही अंतिम मानली जाईल आणि उपदानासाठी पात्रता निश्चित करणाऱ्या अटी व नियमांमधील किंवा आदेशांमधील बदलामुळे आवश्यक असल्याशिवाय पुन्हा उघडली जाणार नाही.

## प्रकरण पाच

## सेवानिवृत्ती उपदान आणि मृत्यू उपदान यांचे विनियमन

**२१. सेवानिवृत्ति उपदान किंवा मृत्यू उपदान**. – (१) ज्याची पाच वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण झाली आहे आणि जो, -

(एक) नियत वयमानानुसार सेवानिवृत्त होतो, किंवा असमर्थतेमुळे सेवानिवृत्त होतो, किंवा

(दोन) महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६ च्या नियम १२ नुसार नियत वयमानाच्या पूर्वी सेवानिवृत्त होतो किंवा सेवानिवृत्त झालेला असतो; किंवा

(तीन) ज्याला राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या पूर्णतः किंवा मोठ्या प्रमाणावर मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील महामंडळात किंवा कंपनीत अथवा महामंडळाअंतर्गत किंवा कंपनीअंतर्गत किंवा राज्य शासनाद्वारे किंवा केंद्र शासनाद्वारे नियंत्रित किंवा वित्तसहाय्यित संस्थेमध्ये किंवा संस्थेअंतर्गत असलेल्या सेवेत किंवा पदावर सामावून घेण्याची परवानगी दिली गेली आहे,

अशा शासकीय कर्मचाऱ्याला, त्याच्या सेवानिवृत्तिनंतर वित्तलब्धीच्या १६½ पट इतक्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, अर्हताकारी सेवेच्या प्रत्येक पूर्ण सहामाही कालावधीकरिता त्याच्या वित्तलब्धीच्या एक चतुर्थांश इतके निवृत्ती उपदान दिले जाईल.

(२) शासकीय कर्मचारी सेवेत असताना मृत्यू पावला तर त्याच्या कुटुंबाला खालील कोष्टकात नमूद केलेल्या दराने मृत्यू उपदान, नियम २३ च्या पोट-नियम (१) मध्ये दर्शविलेल्या पद्धतीने देय होईल:-

तक्ता

| अ.क्र. (१) | अर्हताकारी सेवेचा कालावधी (२) | मृत्यू उपदानाचा दर (३) |
|---|---|---|
| १ | सेवा एक वर्षापर्यंत | वित्तलब्धीच्या दुप्पट |
| २ | सेवा एक वर्षापेक्षा जास्त व पाच वर्षापर्यंत | वित्तलब्धीच्या सहा पट |
| ३ | सेवा पाच वर्षापेक्षा जास्त व अकरा वर्षापर्यंत | वित्तलब्धीच्या बारा पट |
| ४ | सेवा अकरा वर्षापेक्षा जास्त व वीस वर्षापर्यंत | वित्तलब्धीच्या वीस पट |
| ५ | सेवा वीस वर्षापेक्षा जास्त | अर्हताकारी सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक सहामाही कालावधीसाठी वित्तलब्धीच्या निम्मे मात्र वित्तलब्धीच्या ३३ पटींच्या कमाल मर्यादेत. |

परंतु असे की, या नियमानुसार प्रदेय होणारी निवृत्ति उपदानाची किंवा मृत्यू उपदानाची रक्कम कोणत्याही परिस्थितीत वीस लाख रुपयांहून अधिक असता कामा नये.

आणखी असे की, अंतिमरीत्या गणना करण्यात आलेल्या निवृत्ती उपदानाच्या किंवा मृत्यू उपदानाच्या रकमेत रुपयाच्या भागाचा समावेश असेल तेव्हा त्या भागाचे पुढील पूर्ण रुपयात रूपांतर केले जाईल.

(३) या नियमाअन्वये अनुज्ञेय असलेल्या उपदानाच्या प्रयोजनासाठी वित्तलब्धी नियम ६ नुसार मोजली जाईलः

परंतु, जर शासकीय कर्मचाऱ्याची वित्तलब्धी त्याच्या सेवेच्या शेवटच्या दहा महिन्यांत शास्ती व्यतिरिक्त इतर कारणांमुळे कमी झाली असेल, तर नियम ३ मध्ये निर्दिष्ट केलेले निवृत्तिवेतनयोग्य वेतन वित्तलब्धी म्हणून मानण्यात येईल.

(४) सेवानिवृत्ती उपदानासाठी पात्र झालेला एखादा शासकीय कर्मचारी, जेव्हा शास्ती म्हणून सक्तीच्या सेवानिवृत्तीसह त्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या आत मरण पावतो, आणि राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीअंतर्गत अशा वार्षिकीमुळे मृत्यूच्या वेळी त्याने प्रत्यक्षात प्राप्त केलेली रक्कम, कोणतीही असल्यास, पोट-नियम (१) अन्वये अनुज्ञेय असलेल्या सेवानिवृत्ती उपदानासह एकत्रित केल्यास, त्याच्या वित्तलब्धीच्या बारा पटींच्या समान रकमेपेक्षा कमी भरत असेल, तर नियम २३ च्या पोट-नियम (१) मध्ये निर्देशिलेल्या रीतीने त्रुटीइतके अवशिष्ट उपदान त्याच्या कुटुंबाला मंजूर केले जाऊ शकते.

(५) या नियमाच्या आणि नियम २२, २३, २४ व २५ च्या प्रयोजनांसाठी, शासकीय कर्मचाऱ्याच्या संबंधात 'कुटुंब' याचा अर्थ-

(एक) पुरूष शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत एक वा अनेक कायदेशीर पत्नी. यामध्ये न्यायिक फारकत घेतलेल्या एक वा अनेक कायदेशीर पत्नी यांचाही समावेश होतो.

(दोन) महिला शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत कायदेशीर पती. यामध्ये न्यायिक फारकत घेतलेल्या कायदेशीर पतीचाही समावेश होतो.

(तीन) मुलगे यात सावत्र मुलगे आणि दत्तक मुलगे यांचाही समावेश होतो.

(चार) अविवाहित मुली यात सावत्र मुली आणि दत्तक मुली यांचाही समावेश होतो.

(पाच) विधवा मुली यांत सावत्र मुली आणि दत्तक मुली यांचाही समावेश होतो.

(सहा) वडील, ज्यांना व्यक्तिगत कायद्यानुसार दत्तक विधानास परवानगी असेल अशा व्यक्तींच्या बाबतीत, दत्तक आईवडील.

(सात) आई, ज्यांना व्यक्तिगत कायद्यानुसार दत्तक विधानास परवानगी असेल अशा व्यक्तींच्या बाबतीत, दत्तक आईवडील.

(आठ) अठरा वर्षे वयाखालील भाऊ यात सावत्र भावांचाही समावेश होतो.

(नऊ) अविवाहित बहिणी आणि विधवा बहिणी. यात सावत्र बहिणींचाही समावेश होतो.

(दहा) विवाहित मुली, आणि

(अकरा) पूर्वी मृत्यू पावलेल्या मुलांची अपत्ये.

**स्पष्टीकरण**.- (१) अर्हताकारी सेवेच्या कालावधीची गणना करताना, एका वर्षातील तीन महिने इतक्या व त्यापेक्षा अधिक कालावधीचा अपूर्णांक हा एक पूर्ण झालेला सहामाही इतका मानला जाईल आणि अर्हताकारी सेवा म्हणून मोजला जाईल.

(२) ज्या शासकीय कर्मचाऱ्याने आत्महत्या केली आहे त्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीतदेखील मृत्यू उपदान अनुज्ञेय असेल.

२२. **नामनिर्देशने**. – (१) शासकीय कर्मचारी हा, सेवेत किंवा पदावर प्रथमतः कायम झाल्यानंतर यथास्थिती **नमुना २** किंवा **नमुना ३** मध्ये नामनिर्देशन करून त्याद्वारे नियम २१ अनुसार प्रदेय होणारे सेवानिवृत्ति उपदान किंवा मृत्यू उपदान मिळण्याचा हक्क, एका किंवा अधिक व्यक्तींना प्रदान करील.

मात्र, नामनिर्देशन करण्याच्या वेळी-

(एक) शासकीय कर्मचाऱ्याचे कुटुंब असेल तर, त्याच्या कुटुंबियांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे नामनिर्देशन करता येणार नाही;

किंवा

(दोन) शासकीय कर्मचाऱ्याचे कुटुंब नसेल तर, असे नामनिर्देशन एखाद्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या किंवा एखाद्या संस्थेच्या नांवे करता येईल-मग ती संस्था विधिसंस्थापित असो किवा नसो.

(२) जर शासकीय कर्मचाऱ्याने पोट-नियम (१) अनुसार एकाहून अधिक व्यक्तींना नामनिर्देशित केले असेल तर तो, उपदानाची संपूर्ण रक्कम वाटली जाईल अशा रीतीने नामनिर्देशनामध्ये प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीला द्यावयाच्या हिश्श्याची रक्कम नमूद करील.

(३) शासकीय कर्मचारी नामनिर्देशनामध्ये अशी तरतूद करू शकेल की,-

(एक) विशिष्ट नामनिर्देशित व्यक्ती, शासकीय कर्मचाऱ्याच्या पूर्वी मृत्यू पावली किंवा शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर, पण उपदानाची रक्कम मिळण्यापूर्वी मृत्यू पावली तर, अशा कोणत्याही नामनिर्देशित व्यक्तीला प्रदान करण्यात आलेला हक्क नामानिर्देनामध्ये नमूद केले असेल अशा इतर व्यक्तीकडे जाईल,

मात्र, नामनिर्देशन करण्याच्या वेळी, शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंबात एकाहून अधिक व्यक्ती असतील, तर अशी नमूद केलेली विशिष्ट व्यक्ती, ही त्यांच्या कुटुंबियाहून अन्य व्यक्ती असता कामा नये:

आणखी असे की, जेव्हा शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंबात एकच व्यक्ती असेल आणि तिच्या नांवे नामनिर्देशन केलेले असेल तेव्हा, शासकीय कर्मचाऱ्याला कोणत्याही व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या नांवे- मग अशी संस्था विधिसंस्थापित असो किंवा नसो -पर्यायी नामनिर्देशन करण्याची मुभा असेल.

(दोन) नामनिर्देशनामध्ये दिलेली आकस्मिक घटना घडून आल्यास नामनिर्देशन विधिअग्राह्य ठरेल.

(४) नामनिर्देशन करण्याच्या वेळी कुटुंब नसणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याने केलेले नामनिर्देशन किंवा शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या कुटुंबात एकच सदस्य असताना, पोट-नियम (३) च्या खंड (एक) च्या दुसऱ्या परंतुकानुसार केलेले नामनिर्देशन, तो शासकीय कर्मचारी यथास्थिती नंतर कुटुंबवान झाला किंवा त्याच्या कुटुंबात आणखी एखादी व्यक्ती प्रविष्ट झाली तर, विधिअग्राह्य ठरेल.

(५) शासकीय कर्मचारी कोणत्याही वेळी कार्यालय प्रमुखाला लेखी नोटीस पाठवून नामनिर्देशन रद्द करू शकेल:

मात्र, त्याला अशा नोटिशीसोबत, या नियमानुसार केलेले नवीन नामनिर्देशन जोडावे लागेल.

(६) पोट-नियम (३) च्या खंड (एक) अनुसार, जिच्या संबंधात नामनिर्देशनामध्ये कोणतीही विशेष तरतुद करण्यात आलेली नसेल अशा नामनिर्देशित व्यक्तीच्या मृत्यूनंतर तात्काळ किंवा ज्या घटनेमुळे, त्या पोट-नियमाच्या खंड (दोन) अनुसार नामनिर्देशन विधिअग्राह्य ठरेल अशी घटना घडल्यानंतर, शासकीय कर्मचारी कार्यालय प्रमुखाकडे या नियमानुसार केलेल्या नवीन नामनिर्देशनासह मूळचे नामनिर्देशन रद्द करण्यासंबंधी लेखी नोटीस पाठवील.

(७) (क) या नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्याने केलेले प्रत्येक नामनिर्देशन (ते रद्द करण्यासाठी त्याने दिलेली असल्यास, प्रत्येक नोटीस धरून)-

(एक) शासकीय कर्मचारी हा, ज्यांचे वेतन व भत्ते कार्यालय प्रमुखाकडून आस्थापना देयकावर काढले जातात अशा राजपत्रित शासकीय कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त, स्थायी राजपत्रित शासकीय कर्मचारी असेल तर, संबंधित लेखापरीक्षा अधिकाऱ्यांकडे पाठवले जाईल; आणि

(दोन) पोट-नियम (७) (क) (एक) मध्ये निर्देशिलेला राजपत्रित शासकीय कर्मचारी धरून इतर कोणत्याही बाबतीत, कार्यालय प्रमुखाकडे पाठवले जाईल.

(ख) यथास्थिती लेखापरीक्षा अधिकारी किंवा कार्यालय प्रमुख, खंड (क) मध्ये निर्देशिलेले नामनिर्देशन मिळाल्यानंतर तात्काळ, त्यावर मिळाल्याची तारीख टाकून प्रतिस्वाक्षरी करील आणि ते आपल्या ताब्यात ठेवील.

(ग) (एक) कार्यालय प्रमुख, अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्यांच्या नामनिर्देशन पत्रांवर प्रतिस्वाक्षरी करण्यास आपल्या दुय्यम राजपत्रित अधिकाऱ्यांना प्राधिकृत करू शकेल.

(दोन) नामनिर्देशनपत्र मिळाल्यांसंबंधीची योग्य ती नोंद अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवा पुस्तकात केली जाईल.

(८) शासकीय कर्मचाऱ्याने केलेले प्रत्येक नामनिर्देशन आणि ते रद्द करण्यासाठी दिलेली प्रत्येक नोटीस, विधिग्राह्य असतील तेथवर, कार्यालय प्रमुखाला मिळाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

**२३. उपदान प्रदेय असलेल्या व्यक्ती**. – (१) (क) नियम २१ अनुसार नामनिर्देशनाद्वारे, ज्यांना उपदान मिळण्याचा हक्क प्रदान केलेला असेल, त्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना नियम २२ खाली मिळणारे उपदान दिले जाईल.

(ख) जर असे कोणतेही नामनिर्देशन केलेले नसेल किंवा केलेले नामनिर्देशन अस्तित्वात नसेल तर, खाली दर्शविलेल्या पद्धतीने उपदान-

(एक) नियम २१ च्या पोट-नियम (५) मधील खंड (एक), (दोन), (तीन), (चार) आणि (पाच) मध्ये दिल्याप्रमाणे कुटुंबातील एक किंवा त्याहून अधिक व्यक्ती मागे हयात असतील तर, अशा सर्व व्यक्तींना समान हिश्श्यात दिले जाईल.

(दोन) वरील उपखंड (एक) मध्ये दिल्याप्रमाणे कुटुंबातील एकही व्यक्ती मागे हयात नसेल, पण नियम २१ च्या पोट-नियम (५) च्या खंड (सहा), (सात), (आठ), (नऊ), (दहा) आणि (अकरा) मध्ये दिल्याप्रमाणे एक किंवा त्याहून अधिक व्यक्ती असतील तर, अशा सर्व व्यक्तींना समान हिश्श्यात दिले जाईल.

(२) जर शासकीय कर्मचारी, सेवानिवृत्तीनंतर नियम २१ च्या पोट-नियम (१) नुसार अनुज्ञेय उपदान मिळण्यापूर्वी मृत्यू पावला तर, त्याच्या कुटुंबास पोट-नियम (१) मध्ये दर्शवलेल्या पद्धतीने उपदान संवितरित केले जाईल.

(३) सेवेत असताना किंवा सेवानिवृत्त झाल्यावर मृत्यू पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर आणि उपदानाचा आपला हिस्सा मिळण्यापूर्वी त्याच्या कुटुंबातील महिलेने विवाह किंवा पुनर्विवाह केला असला तरी किंवा त्याचा भाऊ १८ वर्षे वयाचा झाला असला तरी अशी महिला किंवा भाऊ यांच्या उपदानाचा हिस्सा मिळण्याच्या हक्कास बाधा येणार नाही.

(४) मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील अज्ञान व्यक्तीस, नियम २१ अनुसार उपदान दिले जाईल तेव्हा ते, अज्ञान व्यक्तीच्या पालकाला, अज्ञान व्यक्तीच्या वतीने प्रदेय होईल.

**स्पष्टीकरण**. – (१) मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील अज्ञान व्यक्तीस, नियम २१ अनुसार उपदान दिले जाईल तेव्हा ते, अज्ञान व्यक्तीच्या पालकाला, त्याने **प्रपत्र-क** मध्ये क्षतिपूर्ती बंधपत्र करून दिल्यानंतर आणि पालकत्वासंबंधीचे शपथपत्र सादर केल्यानंतर अज्ञान व्यक्तीच्या वतीने प्रदेय होईल.

टीप.-हिंदू किंवा ख्रिश्चन माता ही, नैसर्गिक पालक असल्यामुळे तिने क्षतिपूर्ती बंधपत्र किंवा शपथपत्र करून देण्याची आवश्यकता नाही.

(२) कुटुंबातील ज्या सदस्याला उपदानाचा हिस्सा देय आहे, अशा सदस्याचा प्रत्यक्ष रक्कम मिळण्यापूर्वी मृत्यू झाला असल्यास किंवा तो अपात्र ठरला असल्यास, त्याच्या वाट्याचा हिस्सा या नियमाच्या पोट-नियम (१) च्या खंड (ख) नुसार कुटुंबातील उर्वरित सदस्यांमध्ये समान प्रमाणात वाटून दिला जाईल.

(३) मृत्यू किंवा सेवानिवृत्ती उपदानाचे प्रत्यक्ष वाटप करण्यापूर्वी, संवितरण प्राधिकाऱ्याने, ज्यांच्या नावे मंजुरी आदेश जारी करण्यात आला आहे ते कुटुंबातील सर्व सदस्य अजूनही अर्हतापात्र आहेत की नाही, याची निश्चिती करून घ्यावी. जर एखादा सदस्य पात्र नसेल आणि तसेच त्यांच्यापैकी कोणाचा मृत्यू झाला असेल, तर ती वस्तुस्थिती मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याला तात्काळ कळवावी, जेणेकरून कुटुंबातील उर्वरित सदस्यांच्या नावे सुधारित मंजुरी आदेश जारी केला जाऊ शकेल.

२४. **एखाद्या व्यक्तीला उपदान मिळण्यास प्रतिबंध**. – (१) सेवेत असताना शासकीय कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यामुळे, जी व्यक्ती नियम २३ अनुसार उपदान मिळण्यास पात्र असेल त्या व्यक्तीवर शासकीय कर्मचाऱ्याचा खून केल्याचा किंवा असा गुन्हा करण्यास अपप्रेरणा दिल्याचा दोषारोप ठेवण्यात आला असेल तर, तिच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या फौजदारी कार्यवाहीचा निकाल लागेपर्यंत उपदानाचा हिस्सा मिळण्याचा त्या व्यक्तीचा हक्क निलंबित ठेवण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) मध्ये निर्देशिलेल्या फौजदारी कार्यवाहीचा निकाल लागल्यानंतर संबंधित व्यक्ती-

(क) शासकीय कर्मचाऱ्याचा खून केल्याबद्दल किंवा खून करण्यास अपप्रेरणा दिल्याबद्दल सिद्धदोषी ठरली तर, त्या व्यक्तीला उपदानाचा स्वतःचा हिस्सा मिळण्यास प्रतिबंध करण्यात येईल आणि त्या कुटुंबात तो हिस्सा मिळण्यास पात्र असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीस प्रदेय होईल.

(ख) शासकीय कर्मचाऱ्याच्या खुनाच्या किंवा खून करण्यास अपप्रेरणा दिल्याच्या आरोपातून दोषमुक्त ठरली तर, तिचा उपदानाचा हिस्सा तिला प्रदेय होईल.

(३) पोट-नियम (१) व पोट-नियम (२) च्या तरतुदी, नियम २३ च्या पोट-नियम (२) मधील संवितरित न झालेल्या उपदानाला देखील लागू होतील.

**२५. सेवानिवृत्ति उपदान किंवा मृत्यू उपदान व्यपगत होणे**

जेव्हा शासकीय कर्मचारी सेवेत असताना किंवा सेवानिवृत्तीनंतर उपदानाची रक्कम मिळण्यापूर्वी मृत्यू पावला असेल व त्याच्या पश्चात कुटुंब नसेल आणि-

(क) त्याने नामनिर्देशन केलेले नसेल, किंवा

(ख) केलेले नामनिर्देशन अस्तित्वात नसेल,

तेव्हा, नियम २१ अनुसार अशा शासकीय कर्मचाऱ्याच्या संबंधात प्रदेय होणारी मृत्यू उपदान/सेवानिवृत्ति उपदानाची रक्कम शासनाकडे व्यपगत होईल, मात्र ज्या व्यक्तीस न्यायालयाकडून उत्तराधिकार प्रमाणपत्र मंजूर करण्यात आलेले आहे, अशा व्यक्तीस सेवानिवृत्ती उपदान/मृत्यू उपदानाची रक्कम प्रदेय राहील.

**२६. नियत सेवावधी उपदान**. – नियत वयमानानुसार वय पूर्ण झाल्यामुळे सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याला नियम २१ नुसार नियत सेवावधी उपदान मंजूर केले जाईल.

**२७. रुग्णता उपदान**.- जो शासकीय कर्मचारी, कोणत्याही शारीरिक किंवा मानसिक विकलतेमुळे सेवेसाठी कायमचा असमर्थ ठरल्यामुळे, 'महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६ च्या **नियम १५** नुसार सेवेतून सेवानिवृत्त होतो, आणि ज्याने राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत लाभ घेण्याचा पर्याय निवडला असेल किंवा ज्याच्या बाबतीत उक्त नियमांच्या नियम १० अन्वये पूर्वनिर्धारित पर्याय राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीचे लाभ मिळण्यासाठीचा असेल, अशा शासकीय कर्मचाऱ्याला नियम २१ नुसार रुग्णता उपदान मंजूर केले जाईल:

परंतु, ज्या शासकीय कर्मचाऱ्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ अंतर्गत लाभ मिळण्याचा पर्याय निवडला असेल किंवा ज्याच्या बाबतीत महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६ च्या नियम १० अन्वये पूर्वनिर्धारित पर्याय महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियमांचे लाभ मिळण्यासाठीचा असेल, आणि ज्याच्या बाबतीत दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६ (२०१६ चा ४९) च्या कलम २० मधील तरतुदी लागू होत नसतील, असा कर्मचारी कोणत्याही शारीरिक किंवा मानसिक विकलतेमुळे सेवेसाठी कायमचा असमर्थ ठरून सेवानिवृत्त झाल्यास, कार्यालय प्रमुखांद्वारे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ नुसार लाभाचे संवितरण करण्यासंदर्भातील कार्यवाही केली जाईल.

**२८. सेवानिवृत्ती उपदान**. – जो शासकीय कर्मचारी, आस्थापनेवर अतिरिक्त घोषित केल्यामुळे 'महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६' च्या नियम १२

नुसार नियत सेवावधि वय पूर्ण होण्यापूर्वीच स्वतः सेवानिवृत्त होत असेल किंवा सेवानिवृत्त झालेला असेल, तो नियम २१ अन्वये अनुज्ञेय असलेल्या उपदानासाठी हक्कदार असेल.

**२९. सक्तीच्या सेवानिवृत्तीवरील उपदान**. – (१) शिक्षा म्हणून सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला, अशी शिक्षा देण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याकडून, त्याच्या सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकास त्याला अनुज्ञेय असलेल्या उपदानाच्या किमान दोन-तृतीयांश पेक्षा कमी नसलेल्या दराने उपदान मंजूर केले जाऊ शकते.

(२) जेव्हा जेव्हा एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत शासन, या नियमांनुसार अनुज्ञेय असलेल्या पूर्ण उपदानापेक्षा कमी उपदान देण्याचा आदेश (मग तो मूळ, अपीलीय किंवा पुनर्विलोकन अधिकाराचा वापर करून काढलेला असो) पारित करते, तेव्हा असा आदेश पारित करण्यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय केला जाईल.

**३०. बडतर्फी किंवा सेवेतून काढून टाकण्याचा परिणाम**. – ज्या शासकीय कर्मचाऱ्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आले असेल किंवा काढून टाकण्यात आले असेल, त्याच्या उपदानाचे समपहरण होईल:

परंतु, त्याला सेवेतून काढून टाकण्यास सक्षम असलेले प्राधिकरण, जर प्रकरण विशेष विचारास पात्र असेल तर, नियम २१ च्या पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या दरांनी मोजलेल्या सेवानिवृत्ती उपदानाच्या दोन-तृतीयांशपेक्षा अधिक नसेल इतके अनुकंपा उपदान मंजूर करू शकेल.

**३१. महामंडळ, कंपनी किंवा संस्थेमध्ये किंवा तिच्या नियंत्रणाखाली समावेशन केल्याने मिळणारे लाभ**.- (१) ज्या शासकीय कर्मचाऱ्याला पूर्णतः किंवा सारतः राज्य शासनाच्या अथवा केंद्र शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील महामंडळातील किंवा कंपनीतील, अथवा राज्य शासनाकडून किंवा केंद्र शासनाकडून नियंत्रित किंवा अर्थसहाय्यित संस्थेतील सेवेत किंवा पदावर समावेशन करून घेण्याची परवानगी देण्यात आली असेल, तो अशा समावेशनाच्या दिनांकापासून सेवेतून सेवानिवृत्त झाला असल्याचे मानण्यात येईल आणि पोट-नियम (३) च्या अधीन राहून, तो अशा प्रकारे समावेशन झाल्यावर, नियम २१ नुसार समावेशनाच्या दिनांकास असलेल्या अर्हताकारी सेवा आणि निवृतिवेतनपात्र वेतन या आधारावर सेवानिवृत्ति उपदान मिळण्यास पात्र असेल:

परंतु, अशा महामंडळातून किंवा कंपनीतून अथवा संस्थेतून सेवानिवृत्त झाल्यावर, शासनात केलेली सेवा आणि अशा महामंडळात, कंपनीत किंवा संस्थेत केलेली सेवा या दोन्ही संदर्भातील उपदानाची एकूण रक्कम ही, जर तो शासकीय कर्मचारी शासकीय सेवेतच राहिला असता आणि त्याने ज्या वेतनावर त्या महामंडळातून, कंपनीतून किंवा संस्थेतून सेवानिवृत्ती घेतली, त्याच वेतनावर तो शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाला असता तर जितकी रक्कम अनुज्ञेय झाली असती, त्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

(२) (क) जेव्हा एखादा शासकीय कर्मचारी तात्काळ समावेशनाच्या तत्त्वावर एखाद्या महामंडळात, कंपनीत किंवा संस्थेत रुजू होतो, तेव्हा कार्यमुक्त करण्याचा आदेश नमुना ४ मध्ये आदेश काढण्यात येईल आणि त्या कार्यमुक्ती आदेशात, शासकीय कर्मचाऱ्याने त्या महामंडळात, कंपनीत किंवा संस्थेत किती कालावधीत रुजू व्हावे, याचा उल्लेख असेलः

परंतु, शासकीय कर्मचाऱ्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे हा कालावधी कार्यमुक्त करणाऱ्या प्राधिकरणाकडून वाढवून दिला जाऊ शकेल, अशा कारणांची लेखी नोंद केली जाईल.

(ख) कार्यमुक्तीचा दिनांक आणि महामंडळात, कंपनीत किंवा संस्थेत रुजू झाल्याचा दिनांक यामधील कालावधी, शिल्लक असलेल्या देय रजेची मंजुरी देऊन नियमित केला जाऊ शकेल आणि जर अशी कोणतीही रजा शिल्लक नसेल, तर हा कालावधी असाधारण रजा मंजूर करुन नियमित केला जाऊ शकेल.

(ग) कार्यमुक्त करणारे प्राधिकरण, सेवानिवृत्ति लाभांच्या मंजुरीसाठी प्रकरणावर प्रक्रिया करण्यापूर्वी, शासकीय कर्मचारी त्या महामंडळात, कंपनीत किंवा संस्थेत रुजू झाल्याच्या दिनांकाची खात्री करून घेईल आणि शासकीय कर्मचारी रुजू झाल्याच्या दिनांकाच्या अगोदरच्या दिवसाच्या दिनांकापासून त्याचा राजीनामा स्वीकारील.

(घ) कार्यमुक्त करणाऱ्या विभागामध्ये शासकीय कर्मचाऱ्याचा कोणताही धारणाधिकार राखून ठेवला जाणार नाही आणि महामंडळात, कंपनीत किंवा संस्थेत समावेशन झाल्यावर त्याचे शासनासोबतचे सर्व संबंध संपुष्टात आल्याचे समजण्यात येईल.

(३) ज्या संस्थेमध्ये शासकीय कर्मचाऱ्यांचे समावेशन केले गेले आहे आणि जी संस्था राज्य शासनाकडून किंवा केंद्र शासनाकडून नियंत्रित किंवा अर्थसहाय्यित आहे, अशा संस्थेत जर या नियमांतर्गत असलेल्या उपदान योजनेसारखीच उपदान योजना अस्तित्वात असेल, तर त्याला खालीलपैकी एका पर्यायाची निवड करण्याचा अधिकार असेल,-

(क) पोट-नियम (१) नुसार राज्य शासनामध्ये दिलेल्या सेवेसाठी सेवानिवृत्ति लाभ मिळणे; किंवा

(ख) निवृत्तिवेतनासाठी, राज्य शासनामध्ये दिलेली सेवा त्या संस्थेमध्ये गणली जाणे.

(४) जेव्हा एखादा शासकीय कर्मचाऱ्याचे राज्य शासनाकडून किंवा केंद्र शासनाकडून नियंत्रित किंवा अर्थसहाय्यित संस्थेमध्ये समावेशन केले जाते आणि तो पोट-नियम (३) च्या खंड (ख) अंतर्गत पर्यायाची निवड करतो, तेव्हा शासन एकरकमी एक वेळ प्रदान करून आपल्या उपदान दायित्वातून मुक्त होईल आणि हे उपदान दायित्व म्हणजे त्या संस्थेत समावेशनाच्या दिनांकापर्यंतच्या सेवेसाठीच्या सेवानिवृत्ति उपदानाचे भांडवली मूल्य असेल.

(५) समावेशनाचा दिनांक हा महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६ च्या नियम १४ मधील तरतुदींनुसार निश्चित केला जाईल.

**स्पष्टीकरण**.- या नियमाच्या प्रयोजनासाठी, 'संस्था' याचा अर्थ स्वायत्त संस्था किंवा वैधानिक संस्था, असा आहे.

**३२. शासकीय कर्मचारी बेपत्ता असल्याच्या प्रकरणात उपदान देणे**.- (१) जेव्हा एखादा शासकीय कर्मचारी बेपत्ता असेल, तेव्हा त्याच्या कुटुंबाने संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी आणि पोलिसांकडून असा अहवाल प्राप्त करावा की, पोलिसांनी सर्व प्रयत्न करूनही उक्त शासकीय कर्मचाऱ्याचा शोध लागलेला नाही आणि हा अहवाल प्रथम माहिती अहवाल असू शकेल.

(२) पोलीस तक्रार नोंदविल्यापासून एक वर्षानंतर, कुटुंब हे शासकीय कर्मचाऱ्याने ज्या कार्यालयात अंतिम सेवा दिली होती, त्या कार्यालय प्रमुखाकडे नमुना ५ मध्ये सेवानिवृत्ति उपदान मंजूर करण्यासाठी अर्ज करू शकते.

(३) संबंधित विभागाद्वारे पुढील औपचारिकतांचे पालन केल्यानंतर सेवानिवृत्ति उपदान मंजूर केले जाऊ शकते:-

(एक) पोलिसांत नोंदवलेली तक्रार आणि शासकीय कर्मचाऱ्याच्या संदर्भात पोलिसांमार्फत देण्यात आलेला शोध लागलेला नाही असे कळविणारा अहवाल योग्य असल्याची खात्री करणे,

(दोन) शासकीय कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशिताकडून किंवा अवलंबित व्यक्तींकडून प्रपत्र-ख मध्ये एक क्षतिपूर्ती बंधपत्र घेतले जाईल की, जर तो शासकीय कर्मचारी परत आला आणि त्याने कोणताही दावा केला, तर हे सेवानिवृत्ति उपदान त्या शासकीय कर्मचाऱ्याला देय असलेल्या रकमेतून त्याचे समायोजन केले जाईल.

(४) (क) कार्यालय प्रमुख सेवानिवृत्ति उपदान मंजूर करण्यासाठी नमुना ६ मधील प्रकरणावर प्रक्रिया करील.

(ख) सेवानिवृत्ति उपदान अर्जाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत कुटुंबाला दिले जाईल आणि विलंब झाल्यास, लागू असलेल्या भविष्य निर्वाह निधी दराने व्याज दिले जाईल आणि विलंबाची जबाबदारी नियम ४३ नुसार निश्चित केली जाईल.

(ग) मृत्यू उपदान आणि सेवानिवृत्ति उपदान यामधील फरकाची रक्कम, कर्मचाऱ्याचा मृत्यू अंतिमरित्या सिद्ध झाल्यानंतर किंवा पोलीस अहवालाच्या दिनांकापासून सात वर्षांचा कालावधी संपल्यानंतर देय असेल.

(५) कार्यालय प्रमुख, उपदानाची रक्कम मंजूर करण्यापूर्वी, शासकीय कर्मचाऱ्याकडे थकबाकी असलेल्या सर्व शासकीय देण्यांचे मूल्यमापन करतील आणि नियम ४४ नुसार त्यांची वसुली करतील.

## प्रकरण सहा

## उपदानाच्या रकमेचे निर्धारण आणि प्राधिकारपत्र

**३३. उपदान वितरणासाठी कागदपत्रे तयार करणे**.- प्रत्येक कार्यालय प्रमुख, एखादा शासकीय कर्मचारी ज्या दिनांकास नियत सेवावधीमुळे सेवानिवृत्त होणार असेल त्या दिनांकाच्या एक वर्ष आधी, किंवा तो निवृत्तीपूर्व रजेवर ज्या दिनांकास जाईल त्या दिनांकास, यांपैकी जे आधी असेल त्या दिनांकास, नमुना ६ मध्ये उपदान मंजुरीसाठी कागदपत्रे तयार करण्याचे काम हाती घेतील.

**३४. "ना-मागणी प्रमाणपत्र" देण्यासंबंधी संबंधित कार्यकारी अभियंत्याला सूचना** – (१) शासकीय निवासस्थान मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्या (यात यापुढे 'वाटप-प्राप्त कर्मचारी' असा निर्देश केला आहे) सेवानिवृत्तीच्या अपेक्षित दिनांकाच्या किमान **एक वर्ष अगोदर**, कार्यालय प्रमुख, महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६ च्या नियम २० नुसार संबंधित कार्यकारी अभियंत्याला, वाटप प्राप्त कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीपूर्वीच्या **आठ महिन्यांच्या** कालावधीच्या संबंधात "ना-मागणी प्रमाणपत्र" देण्यासाठी लिहील.

**३५. नियत सेवावधीवरील उपदानाचे प्रदान करण्यासाठी कागदपत्र पूर्ण करण्यासंबंधीचे टप्पे**. – कार्यालय प्रमुख, नियम ३३ मध्ये नमूद केलेला पूर्वतयारीचा **एक वर्षाचा** कालावधी खालील तीन टप्प्यात विभागील-

(**क**) **पहिला टप्पा**.-सेवेची पडताळणीः-(एक) कार्यालय प्रमुख शासकीय कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक काळजीपूर्वक पाहून आणि नियम २० अन्वये पडताळणी केल्याबद्दलचे प्रमाणपत्र नोंदलेले आहे याबद्दल आपली खात्री करून घेईल.

(दोन) सेवेच्या ज्या भागाची किंवा भागांची पडताळणी झालेली नसेल, तो अशा सेवेच्या त्या भागाची किंवा भागांची पडताळणी करील, यथास्थिति, वेतन देयके, वेतनपट किंवा इतर संबंधित अभिलेख जसे की, अंतिम वेतन प्रमाणपत्र, मागील आर्थिक वर्षाचे सेवा पडताळणी दर्शविणारी एप्रिल महिन्याची वेतनचिठ्ठी यांच्या आधारे केले जाईल आणि सेवापुस्तकात आवश्यक ती प्रमाणपत्रे नोंदवली जातील.

(तीन) जेव्हा कोणत्याही कालावधीच्या सेवेची पडताळणी उप-खंड (एक) व उप-खंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने करणे शक्य नसेल, आणि तो सेवा कालावधी शासकीय कर्मचाऱ्याने इतर कार्यालयात किंवा विभागात बजावलेला असेल, तेव्हा ज्या कार्यालय प्रमुखांच्या हाताखाली तो कर्मचारी सध्या कार्यरत आहे, ते कार्यालय प्रमुख पडताळणीच्या प्रयोजनासाठी सदर सेवा कालावधीच्या नोंदी ज्या कार्यालयात कर्मचारी कार्यरत असल्याचे दर्शविले आहे, त्या कार्यालय प्रमुखांकडे संदर्भित करतील.

(चार) उप-खंड (तीन) मध्ये निर्दिष्ट पत्रव्यवहार प्राप्त झाल्यानंतर, त्या कार्यालयाचे किंवा विभागाचे कार्यालय प्रमुख, उप-खंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने अशा सेवेच्या भागाची पडताळणी करतील आणि असा संदर्भ प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत संदर्भित करणाऱ्या कार्यालय प्रमुखांकडे आवश्यक ती प्रमाणपत्रे पाठवतील:

परंतु, एखाद्या सेवा कालावधीची पडताळणी करणे अशक्य असल्यास, ती बाब देखील संदर्भित करणाऱ्या कार्यालय प्रमुखाच्या तात्काळ निदर्शनास आणून दिली जाईल.

(पाच) उप-खंड (चार) मध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्यास, असा सेवा कालावधी किंवा असे कालावधी उपदानासाठी अर्हताकारी मानले जातील.

(सहा) जर कोणत्याही वेळी असे आढळून आले की, कार्यालय प्रमुख आणि इतर संबंधित प्राधिकारी, अर्हताकारी सेवेचा कोणताही कालावधी कळवण्यास अपयशी ठरले आहेत, तर प्रशासकीय विभागाचे सचिव अशा प्रकारे माहिती न कळवण्याबद्दलची जबाबदारी निश्चित करतील.

(सात) उप-खंड (एक), (दोन), (तीन), (चार) व (पाच) मध्ये विनिर्दिष्ट केलेली प्रक्रिया शासकीय कर्मचाऱ्याच्या नियत सेवावधीच्या दिनांकाच्या आठ महिने आधी पूर्ण केली जाईल.

(आठ) जेव्हा शासकीय कर्मचाऱ्याने दिलेल्या सेवेचा कोणताही भाग उप-खंड (एक) किंवा उप-खंड (दोन) किंवा उप-खंड (तीन) किंवा उप-खंड (चार) किंवा उप-खंड (पाच) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने पडताळणे शक्य नसेल, तेव्हा त्या शासकीय कर्मचाऱ्याला एका महिन्याच्या आत एका कोऱ्या कागदावर लेखी विवरणपत्र सादर करण्यास सांगितले जाईल, ज्यामध्ये त्याने प्रत्यक्षात त्या कालावधीत प्रत्यक्षात सेवा दिल्याचे नमूद केलेले असेल, आणि तो त्या विवरणपत्राच्या शेवटी त्या विवरणपत्राच्या सत्यतेबद्दलची घोषणा करेल व त्यावर स्वाक्षरी करील.

(नऊ) कार्यालय प्रमुख, उप-खंड (आठ) मध्ये नमूद केलेल्या लेखी कथनातील वस्तुस्थिती विचारात घेऊन, त्या शासकीय कर्मचाऱ्याच्या उपदानाची परिगणना करण्याच्या प्रयोजनासाठी, सेवेचा तो भाग प्रत्यक्षात दिला असल्याचे मान्य करील.

(दहा) एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याने, तो किंवा ती अन्यथा ज्या लाभासाठी हक्कदार नाहीत, त्या कोणत्याही लाभासाठी, त्यास किंवा तिस हक्कदार ठरणारी कोणतीही चुकीची माहिती जाणूनबुजून दिल्याचे आढळून आल्यास, ते गंभीर गैरवर्तन मानले जाईल.

(**ख**) **दुसरा टप्पा**.--**सेवापुस्तकातील उणिवा भरून काढणे**:-

(एक) कार्यालय प्रमुख, सेवा पडताळणीच्या प्रमाणपत्रांची छाननी करताना "वित्तलब्धी" आणि उपदानाकरिता अर्हताकारी सेवा निश्चित करण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष संबंध असलेल्या इतर कोणत्याही त्रुटी, अपूर्णता किंवा उणिवा देखील निदर्शनास आणील.

(दोन) खंड (क) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सेवेची पडताळणी पूर्ण करण्याकरिता आणि या खंडाच्या उपखंड (एक) मध्ये नमूद करण्यात आलेल्या त्रुटी, अपूर्णता किंवा उणिवा भरून काढण्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येईल.

(तीन) दुरुस्ती करण्यास असमर्थ असलेली कोणतीही त्रुटी, अपूर्णता किंवा कमतरता आणि त्याबद्दल शासकीय सेवकाने ज्याबद्दल निवेदन सादर केलेले नाही असा सेवेचा कालावधी आणि खंड (क) मध्ये दिलेल्या पद्धतीनुसार पडताळणी करणे शक्य नसेल असा सेवापुस्तकात पडताळणी केलेला म्हणून दर्शविलेला सेवेचा भाग धरून कोणतीही त्रुटी, अपूर्णता किंवा उणिवा दुर्लक्षित करण्यात येतील आणि सेवापुस्तकातील नोंदीच्या आधारे उपदानासाठी अर्हताकारी सेवा निश्चित करण्यात येईल.

(चार) कार्यालय प्रमुख, निवृत्तिवेतनार्ह वेतनाची गणना करण्याच्या प्रयोजनासाठी सेवेच्या शेवटच्या दहा महिन्यांत मिळालेली किंवा मिळावयाची वित्तलब्धी बरोबर आहे याची सेवापुस्तकावरून पडताळणी करील.

(पाच) सेवेच्या शेवटच्या दहा महिन्यांमधील वेतन सेवापुस्तकात अचूकरीत्या दर्शविण्यात आले असल्याची खात्री करून घेण्यासाठी, कार्यालय प्रमुखाला, शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेमागील केवळ **चोवीस महिन्यातील** वित्तलब्धी बरोबर आहे हे पडताळून पाहता येईल. मात्र, त्यापलीकडील कोणत्याही कालावधीतील पडताळणी करण्याची गरज नाही.

(**ग**) **तिसरा टप्पा**.- दुसरा टप्पा पूर्ण झाल्यावर लगेचच परंतु शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकाच्या पूर्वी आठ महिन्यांपेक्षा नंतरच्या नसेल अशा कालावधीत, कार्यालय प्रमुख,-

(एक) सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास उपदानाच्या प्रयोजनासाठी दाखल करावयाच्या प्रस्तावित अर्हताकारी सेवेच्या कालावधीशी संबंधित प्रमाणपत्र आणि सेवानिवृत्ती उपदानासाठी गणना करावयाची प्रस्तावित वित्तलब्धी आणि निवृत्तिवेतनार्ह वेतन याच्या योग्य प्रदानाबाबत माहिती सादर करील.

(दोन) कार्यालय प्रमुखाने दर्शवलेली प्रमाणित सेवा तसेच वित्तलब्धी सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास मान्य नसेल तर, त्यास त्याने ती न स्वीकारण्याची कारणे व आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ पुष्टी दिलेली संबंधित कागदपत्रे यांसह दोन महिन्यांच्या आत कार्यालय प्रमुखाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात येतील.

**३६. नमुना ७ चा भाग एक पूर्ण करणे**. – नियम ३५ पोट-नियम (१) खालील प्रकरणांच्या बाबतीत, कार्यालय प्रमुख शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी चार महिन्यांच्या आत नमुना ७ चा भाग एक पूर्ण करील आणि तेथे शासकीय कर्मचारी नियत सेवावधी व्यतिरिक्त अन्य कारणास्तव सेवानिवृत्त होत असेल, त्या बाबतीत कार्यालय प्रमुख नमुना ७ चा भाग एक शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीनंतर दोन महिन्यांच्या आत पूर्ण करील.

**३७. उपदानाच्या प्रदानासाठी नमुना ७ आणि नमुना ८ लेखापरीक्षा अधिकाऱ्याला अग्रेषित करणे**. – (१) नियम ३५ व ३६ मधील आवश्यक बाबी पूर्ण केल्यानंतर, कार्यालय प्रमुख, रीतसर भरलेले नमुना ७, शासकीय कर्मचाऱ्याचे योग्यरीत्या भरून अद्यावत केलेले सेवापुस्तक आणि सेवेच्या पडताळणीसाठी उपयुक्त अशी इतर आवश्यक कागदपत्रे नमुना ८ मधील उपरिपत्रासह लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे पाठवील.

(२) कार्यालय प्रमुख त्याच्या अभिलेखासाठी नमुना ७ आणि नमुना ८ ची एक प्रत ठेवील.

(३) पोट-नियम (१) मध्ये निर्देशित केलेले नमुने शासकीय कर्मचाऱ्यांच्या नियत सेवावधीच्या दिनांकापूर्वीच्या चार महिन्यांपेक्षा अधिक उशिरा नसेल आणि नियत सेवावधी सेवानिवृत्ती व्यतिरिक्त अन्य प्रकरणांत शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतर दोन महिन्यांच्या आत लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे अग्रेषित करण्यात येतील.

**३८. उपदानाशी संबंधित अशी कोणतीही घटना लेखापरीक्षा अधिकाऱ्याला कळविणे**. – उपदानाविषयक कागदपत्रे लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे पाठविण्यात आल्यानंतर, अनुज्ञेय उपदानाच्या रकमेवर परिणाम होईल अशी कोणतीही घटना घडली तर, कार्यालय प्रमुखाने ती घटना लेखापरीक्षा अधिकाऱ्याला ताबडतोब कळविली पाहिजे.

**३९. शासनाला येणे असलेल्या रकमांचा तपशील लेखापरीक्षा अधिकाऱ्याला कळविणे**. – (१)कार्यालय प्रमुख, नियम ४४ अनुसार शासनाला येणे असलेल्या रकमांबद्दल खात्री करून घेतल्यानंतर व त्या निर्धारित केल्यानंतर त्याचे तपशील नमुना ८ मध्ये लेखापरीक्षा अधिकाऱ्यास सादर करील.

(२) शासनाला येणे असलेल्या रकमांचा तपशील पोट-नियम (१) अन्वये लेखापरीक्षा अधिकाऱ्याला कळविण्यात आल्यानंतर, शासनाला येणे असलेली आणखी कोणतीही रक्कम कार्यालय

प्रमुखाच्या निदर्शनास आली तर, अशी येणे रक्कम ताबडतोब लेखापरीक्षा अधिकाऱ्याला कळविण्यात येईल.

**४०. विभागीय किंवा न्यायिक कार्यवाही व्यतिरिक्त अन्य कारणांसाठी तात्पुरते उपदान**. – (१) नियम ३५ मध्ये घालून दिलेली कार्यपध्दती अनुसरून सुध्दा, कार्यालय प्रमुखास नियम ३७ च्या पोट-नियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत उपदानासाठीचे नमुने लेखापरीक्षा अधिकाऱ्यास पाठवणे शक्य नसेल किंवा लेखापरीक्षा अधिकाऱ्यास उपदानाच्या प्रदानासाठी अशा विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत नमुने पाठवण्यात आलेले आहेत, मात्र उपदानाच्या प्रदानाचा आदेश काढण्यापूर्वी आणखी माहिती मिळविण्यासाठी लेखापरीक्षा अधिकाऱ्याने कार्यालय प्रमुखास नमुने परत पाठवले असतील आणि शासकीय कर्मचारी या नियमांच्या तरतुदींनुसार त्याचे उपदान अंतिम निर्धारित व निश्चित होण्यापूर्वी, सेवानिवृत्त होण्याची शक्यता असल्यास, कार्यालय प्रमुख, कार्यालयीन अभिलेखांमध्ये उपलब्ध असेल त्याप्रमाणे अशा माहितीवर आधारित आणि विनाविलंब, तात्पुरती सेवानिवृत्तीच्या उपदानाची रक्कम निर्धारित करील.

(२) नियत सेवावधी व्यतिरिक्त अन्यथा सेवानिवृत्तीच्या प्रकरणी, कार्यालय प्रमुख, सेवानिवृत्ती उपदानाचे अंतिम निर्धारण होईपर्यंतच्या दोन महिन्यांच्या आत तात्पुरते सेवानिवृत्ती उपदान मंजूर करील.

(३) विभागीय किंवा न्यायिक कार्यवाही व्यतिरिक्त अन्य कारणांसाठी उपदानाची रक्कम निर्धारित करणे शक्य नसल्यास, कार्यालय प्रमुख,-

(क) तात्पुरते उपदान म्हणून, शंभर टक्के उपदान प्राधिकृत करणारे आणि उपदानाच्या दहा टक्के राखून ठेवणारे मंजुरी पत्र, त्याची एक प्रत शासकीय कर्मचाऱ्यास पृष्ठांकित करून लेखापरीक्षा अधिकाऱ्यांना देईल.

(ख) नियम ३९ पोट-नियम (१) अन्वये उपदानामधून वसुल करावयाची रक्कम, मंजुरी पत्रामध्ये विनिर्दिष्ट करील आणि खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेले मंजुरी पत्र दिल्यानंतर, कार्यालय प्रमुख खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम आणि नियम ४४ मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम कोणतीही असल्यास ती आस्थापनेचे वेतन आणि भत्ते ज्या रीतीने त्याच्याकडून वसूल करण्यात येतात त्याच रीतीने उपदानाच्या रकमेतून वजा केल्यानंतर, तात्पुरत्या उपदानाची रक्कम काढील.

(४) पोट-नियम (२) किंवा पोट-नियम (३) अन्वये देय उपदानाची रक्कम, आवश्यक असल्यास, अभिलेखांची तपशीलवार छाननी पूर्ण झाल्यावर पुनरीक्षित करण्यात येईल.

(५) (क) शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून सहा महिने समाप्त होण्यापूर्वी कार्यालय प्रमुखाने लेखा अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून अंतिम उपदानाची रक्कम निर्धारित

केलेली असल्यास, लेखापरीक्षा अधिकारी तात्पुरत्या उपदानाचे प्रदान केल्यानंतर, निदर्शनास येतील अशा शासकीय देय रकमांचे, कोणत्याही असल्यास, समायोजन केल्यानंतर, उपदानाची अंतिम रक्कम आणि पोट-नियम (३) च्या खंड (ख) अन्वये प्रदान केलेली तात्पुरत्या उपदानाची रक्कम यांमधील फरकाचे आहरण व संवितरण करण्याचे निदेश, कार्यालय प्रमुखास देईल.

(ख) (एक) पोट-नियम (३) अन्वये कार्यालय प्रमुखाने संवितरित केलेली तात्पुरत्या उपदानाची रक्कम अंतिमतः निर्धारित केलेल्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्याने, त्याला प्रत्यक्ष संवितरित केलेली जादा रक्कम परत करणे आवश्यक असणार नाही.

(दोन) कार्यालय प्रमुख, अंतिमतः निर्धारित केलेल्या रकमेतून उपदानाची रक्कम संवितरित करण्याची संभाव्यता कमी करण्यात आलेली आहे आणि अतिरिक्त प्रदानासाठी जबाबदार असलेले अधिकारी हे अतिप्रदानासाठी उत्तरदायी असतील, याची सुनिश्चिती करील.

(६) पोट-नियम (५) च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत कार्यालय प्रमुखाने लेखापरीक्षा अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून, उपदानाची अंतिम रक्कम निर्धारित केलेली नसेल तर, लेखापरीक्षा अधिकारी, तात्पुरते उपदान हे अंतिम उपदान म्हणून समजेल आणि सहा महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यावर तात्काळ मंजुरी आदेश काढील.

(७) पोट-नियम (५) किंवा पोट-नियम (६) च्या खंड (क) अन्वये लेखापरीक्षा अधिकाऱ्याने प्राधिकृत आदेश काढल्यावर, कार्यालय प्रमुख पोट-नियम (३) च्या खंड (ख) अन्वये तात्पुरत्या उपदानाचे प्रदान केल्यावर ज्या शासकीय देय रकमा निदर्शनास येतील, त्यांचे समायोजन केल्यानंतर सेवानिवृत शासकीय कर्मचाऱ्यास पोट-नियम (२) च्या खंड (क) अन्वये स्थगित केलेली उपदानाची रक्कम देईल.

(८) शासकीस कर्मचारी हा शासकीय निवासस्थानाचा वाटपग्राही आहे किंवा होता, तर स्थगित केलेली रक्कम, कार्यकारी अभियंत्याकडून "ना-मागणी प्रमाणपत्र" प्राप्त झाल्यावर प्रदान करण्यात येईल.

**४१. लेखापरीक्षा अधिकाऱ्याद्वारे उपदानास अधिकृत मंजुरी देणे.** – (१) (क) नियम ३७ मध्ये निर्देशित उपदानाच्या प्रदानासाठी नमुने प्राप्त झाल्यावर, लेखापरीक्षा अधिकारी, आवश्यक तपासण्या करील, नमुना ७ च्या भाग दोन मधील खाते मुखांकनाची नोंद घेईल आणि उपदानाच्या रकमेचे निर्धारण करील आणि शासकीय कर्मचाऱ्याचे नियत सेवावधीचे वय झाल्यावर, त्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी किमान एक महिना अगोदर प्राधिकारपत्र देईल.

(ख) नियत सेवावधीच्या वयाव्यतिरिक्त सेवानिवृत्तीच्या बाबतीत अन्यथा, लेखापरीक्षा अधिकारी आवश्यक तपासण्या करील, नमुना ७ चा भाग दोन पूर्ण करील, उपदानाची रक्कम निर्धारित करील, देणी निर्धारित करील आणि कार्यालय प्रमुखाकडून उपदानाच्या प्रदानासाठीचे नमुने प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत प्राधिकारपत्र देईल.

(२) पोट-नियम (१) च्या खंड (क) अन्वये लेखापरीक्षा अधिकाऱ्याद्वारे निर्धारित करण्यात आलेली उपदानाची रक्कम, अधिदान व लेखा अधिकाऱ्याच्या अधिमान्यतेच्या देयकाद्वारे उपदानाची रक्कम काढता येईल आणि नियम ४४ मध्ये निर्देशित केलेली, कोणतीही असल्यास शासकीय देणी समायोजन केल्यानंतर, कार्यालय प्रमुखाद्वारे सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यास संवितरित करण्यात येईल, अशा शेऱ्यासह, कार्यालय प्रमुखास सूचना देण्यात येईल.

(३) नियम ४५ च्या पोट-नियम (५) अन्वये रोखून ठेवलेली उपदानाची रक्कम, कार्यकारी अभियंत्याने सूचित केलेले थकीत अनुज्ञप्ती शुल्क, कार्यालय प्रमुखाद्वारे समायोजित करण्यात येईल आणि शिल्लक, कोणतीही असल्यास, सेवानिवृत शासकीय कर्मचाऱ्यास परत करण्यात येईल.

**४२. प्रतिनियुक्तीवरील शासकीय कर्मचारी**. – (१) राज्य शासनाच्या दुसऱ्या विभागामध्ये/ कार्यालयामध्ये प्रतिनियुक्तीवर असताना सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याच्याबाबतीत, या नियमाच्या तरतुदींनुसार उपदान प्राधिकृत करण्यासंबंधीची कार्यवाही, त्याची सेवा उसनवारीने घेणाऱ्या विभागाच्या कार्यालय प्रमुखाकडून केली जाईल.

(२) केंद्र शासनाकडे किंवा स्वीयेत्तर सेवेमध्ये प्रतिनियुक्तीवर असताना सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत, या नियमांच्या तरतुदींनुसार निवृत्तिवेतन व उपदान प्राधिकृत करण्यासंबंधीची कार्यवाही केंद्र शासनाकडे किंवा स्वीयेत्तर सेवेमध्ये प्रतिनियुक्ती मंजूर करणाऱ्या संवर्ग प्राधिकाऱ्याच्या कार्यालय प्रमुखाकडून केली जाईल.

**४३. विलंबाने प्रदान करण्यात आलेल्या उपदानावर व्याज**. – (१) नियत सेवावधी व्यतिरिक्त इतर सेवानिवृत्तीच्या प्रकरणांसह, ज्या दिनांकास प्रदान देय असते, त्या दिनांकानंतर उपदानाचे प्रदान मंजूर करण्यात आलेले असेल आणि प्रदानासाठी झालेला विलंब हा प्रशासकीय कारणांमुळे किंवा चुकांमुळे झालेला होता, असे स्पष्टपणे सिद्ध झाले असेल तर, वेळोवेळी यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांनुसार, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधीत लागू असलेल्या दराने आणि रीतीनुसार व्याज प्रदान करण्यात येईल.

परंतु, प्रदानास झालेला विलंब हा उपदानाच्या प्रदानासाठी त्याच्या कागदपत्रांची प्रक्रिया करण्यासाठी शासनाने घालून दिलेल्या कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात शासकीय कर्मचाऱ्याने कसूर केल्यामुळे झालेला नसावा .

(२) सेवानिवृत्ती उपदानाचे किंवा यथास्थिति, मृत्यू उपदानाचे विलंबित प्रदान असल्यास, त्याबाबतीत, संबंधित प्रशासकीय विभागाद्वारे स्वाधिकारे विचार करण्यात येईल, आणि अशा उपदानाच्या प्रदानातील विलंब हा प्रशासकीय चुकांमुळे झाला होता, अशी विभागाची खात्री पटली असेल तर, तो विभाग, या

बाबतीतील महालेखापाल (लेखा व हक्कदारी) महाराष्ट्र, मुंबई किंवा यथास्थिति, नागपूर यांच्याकडून अनुज्ञेयता अहवाल प्राप्त झाल्यानंतर व्याजाचे प्रदान मंजूर करील.

(३) प्रशासकीय चुकांमुळे सेवानिवृत्तीवरील उपदान किंवा यथास्थिति, मृत्यू उपदानावरील व्याज प्रदान करण्यात आलेल्या सर्व प्रकरणांमध्ये, संबंधित प्रशासकीय विभाग, त्याची जबाबदारी निश्चित करील आणि अशा उपदानाच्या प्रदानातील विलंबासाठी जे जबाबदार असल्याचे आढळून आले आहेत, त्या संबंधित अधिकाऱ्यासह, शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध किंवा संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही हाती घेण्यात येईल आणि अशा उपदानाच्या प्रदानातील विलंबास जे जबाबदार असतील त्या संबंधित अधिकाऱ्यासह, शासकीय कर्मचाऱ्याकडून किंवा संबंधित सेवकांकडून, प्रदान करावयाच्या आवश्यक असलेल्या व्याजाची रक्कम वसूल करील.

**स्पष्टीकरण**:- (१) उपदानाच्या प्रदानास वरील नियत सेवावधीच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून तीन महिन्यांपेक्षा अधिक विलंब झाला असल्यास, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी जमा ठेवीस वेळोवेळी लागू असलेल्या दराने व्याज प्रदान करण्यात येईल.

(४) उपदानाच्या प्रदानातील विलंब आणि त्यासाठीच्या व्याजाचे प्रदान पुढील रीतीने निर्धारित करण्यात येईल:-

(एक) सेवानिवृत्तीच्या दिनांकास शिस्तभंगाची किंवा न्यायिक कारवाई ज्या शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध प्रलंबित असल्यास आणि ज्यामध्ये नियम ५ नुसार कार्यवाहीचा निकाल लागेपर्यंत उपदान स्थगित केले आहे, -

(क) शासकीय कर्मचाऱ्यास सर्व दोषारोपातून निर्दोष ठरविण्यात आले असेल आणि अशा कार्यवाहीच्या समाप्तीनंतर उपदान प्रदान केले असेल अशा प्रकरणात, त्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून तीन महिन्यानंतर उपदानाचे प्रदान मंजूर करण्यात आलेले असेल तर, सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या पुढील कालावधीसाठी, त्या उपदानावर वेळोवेळी सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी जमा ठेवीसाठी वेळोवेळी लागू असलेल्या दराने व्याज देण्यास मुभा असेल.

(ख) शिस्तभंगविषयक किंवा न्यायिक कार्यवाही प्रलंबित असताना, शासकीय कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यामुळे शिस्तभंगविषयक किंवा न्यायिक कार्यवाही थांबवली असेल तर अशा प्रकरणी, मृत्यूच्या दिनांकापासून तीन महिन्यानंतर उपदानाचे प्रदान मंजूर करण्यात आलेले असेल तर, मृत्यूच्या दिनांकापासून तीन महिन्यांपेक्षा अधिक विलंबाच्या कालावधीसाठी सार्वजनिक भविष्य निर्वाह निधीच्या जमा ठेवीस वेळोवेळी लागू असणाऱ्या दराने व्याज देण्यास मुभा असेल.

(ग) शिस्तभंगविषयक किंवा न्यायिक कार्यवाहीच्या निकालात शासकीय कर्मचाऱ्यास पूर्णपणे निर्दोष ठरविण्यात आलेले नसेल आणि सक्षम प्राधिकाऱ्याने उपदानाचे प्रदान करण्याचे ठरविले असेल, तर अशा प्रकरणी, सक्षम प्राधिकाऱ्याने उपदानाच्या प्रदानासाठी आदेश काढल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांनंतर उपदानाचे प्रदान मंजूर केले असेल तर, सक्षम प्राधिकाऱ्याने उपरोल्लेखित आदेश काढल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांनंतर होणाऱ्या अधिक विलंबाच्या कालावधीसाठी सार्वजनिक भविष्य निर्वाह निधीच्या जमा ठेवीस वेळोवेळी लागू असलेल्या दराने व्याज देण्यास मुभा असेल.

(दोन) नियत सेवावधी व्यतिरिक्त इतर सेवानिवृत्तीवर, -

अशी सेवानिवृत्तीची प्रकरणे महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६ च्या नियम १२, १५, १६ किंवा १७ अन्वये असतील आणि अशा प्रकरणांमध्ये, उपदानाच्या प्रदानास, सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यापेक्षा अधिक विलंब झालेला असल्यास सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या पुढील विलंबाच्या कालावधीसाठी सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी जमा ठेवीस वेळोवेळी लागू असलेल्या दराने व्याज प्रदान करण्यात येईल.

(तीन) सेवेत असताना शासकीय कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यावर.- मृत्यू उपदानाच्या प्रदानास मृत्यूच्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा अधिक विलंब झालेला असल्यास, मृत्यूच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या पुढील विलंब कालावधीसाठी सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी जमा ठेवीस वेळोवेळी लागू असलेल्या दराने व्याज प्रदान करण्यात येईल आणि कोणत्याही प्रकरणात, एकापेक्षा अधिक दावेदार सारखाच दावा करत असल्यामुळे, मृत्यू उपदानाचे प्रदान राखून ठेवलेले असल्यास, अशा प्रकरणात या आदेशांच्या संज्ञेतील व्याजाच्या प्रदानासाठी आपोआप पात्र होणार नाही आणि ते वित्त विभागाशी विचारविनिमय करून ठरविण्यात येईल.

(चार) संबंधित शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकाच्या पूर्वीच्या दिनांकापासून वित्तलब्धीच्या सुधारणेमुळे किंवा उपदानाशी संबंधित धोरणातील बदलामुळे आधीच प्रदान केलेली उपदानाची रक्कम वाढवलेली असल्यास आणि उपदानाच्या फरकाच्या प्रदानास वित्तलब्धीची सुधारणा करणारा आदेश काढण्याच्या किंवा नियमांमध्ये बदल केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या कालावधीपेक्षा अधिक विलंब झालेला असेल तर, वित्तलब्धीची सुधारणा करणारा आदेश काढल्याच्या किंवा नियमामध्ये बदल केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांपेक्षा अधिक विलंब कालावधीसाठी सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी जमा ठेवीस वेळोवेळी, लागू असलेल्या दराने, व्याज प्रदान करण्यास मुभा असेल.

(पाच) जेव्हा, शासकीय विभागाचे किंवा त्याच्या एखाद्या भागाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमात किंवा स्वायत्त संस्थेत रूपांतरण झाल्यामुळे, *सामूहिकरीत्या* बदली होण्याव्यतिरिक्त इतर मार्गाने, शासकीय कर्मचाऱ्याचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमात किंवा स्वायत्त संस्थेत कायमस्वरूपी समावेशन करण्यात आले असेल, आणि जेव्हा अशा समावेशनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी उपदानाचे प्रदान विलंबाने झाले असेल, तेव्हा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये किंवा स्वायत्त संस्थेत अशा कायमस्वरूपी समावेशनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांपुढील विलंबाच्या कालावधीसाठी, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी ठेवींवर वेळोवेळी लागू असलेल्या दराने व्याज देण्यास मुभा असेल.

**४४. शासनाला येणे असलेल्या रकमांची वसुली व समायोजन**. – (१) सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याकडून शासनाला येणे असलेल्या रकमांबाबत खात्री करून घेणे व त्या निर्धारित करणे हे कार्यालय प्रमुखाचे कर्तव्य असेल.

(२) कार्यालय प्रमुखाने खात्रीपूर्वक निर्धारित केल्याप्रमाणे शासनाला येणे असलेल्या ज्या रकमा शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यंत शिल्लक राहतील, त्या रकमा त्याला देय होणाऱ्या सेवानिवृत्ति उपदानाच्या रकमेशी समायोजित करण्यात येतील.

**स्पष्टीकरण**.- (१) या नियमाच्या प्रयोजनार्थ, 'शासकीय देय रकमा' या शब्द प्रयोगात पुढील गोष्टींचा समावेश होतो,-

(क) शासकीय निवासस्थानाशी संबंधित देय रकमा, ज्यामध्ये अनुज्ञप्ती शुल्काची थकबाकी तसेच वाटपग्राहीच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतर अनुज्ञेय कालावधीच्या पलीकडे शासकीय निवासस्थानाचा ताबा ठेवल्याबद्दलचे नुकसान, कोणतेही असल्यास;

(ख) शासकीय निवासस्थानाशी संबंधित असलेल्या येणे रकमांव्यतिरिक्त इतर रकमा म्हणजे घरबांधणी अग्रिम किंवा वाहन अग्रिम किंवा इतर कोणतेही अग्रिम यांच्या शिल्लक रकमा, वेतन व भत्ते किंवा रजा वेतन यांची जादा प्रदान करण्यात आलेली रक्कम आणि आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) या खाली आयकराच्या मुळातच होणाऱ्या वजातीची शिल्लक रक्कम यांचा समावेश होतो.

**स्पष्टीकरण**.- (२) निवृत्त शासकीय कर्मचाऱ्याला प्रदेय असलेल्या सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेतून केवळ स्पष्टीकरण (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शासकीय देय रकमांचे समायोजन करण्यात येईल आणि उक्त स्पष्टीकरण (१) च्या अर्थानुसार शासकीय देय रकमा नसलेल्या इतर कोणत्याही देय रकमांची सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेतून वसुली केली जाणार नाही.

**४५. शासकीय निवासस्थानाशी संबंधित असलेल्या येणे रकमांचे समायोजन व वसुली**. – (१) "ना-मागणी प्रमाणपत्र" देण्यासंबंधात कार्यालय प्रमुखाकडून महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन

प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६ याच्या नियम २० च्या पोट-नियम (१) अन्वये सूचना मिळाल्यानंतर संबंधित कार्यकारी अभियंता आपले अभिलेख पडताळून पाहील व शासकीय निवासस्थान मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेच्या आठ महिने अगोदर, त्या कर्मचाऱ्याकडून त्याच्या सेवानिवृत्तीच्या अगोदरच्या आठ महिन्यांच्या कालावधीबाबत वसुलीयोग्य कोणतीही अनुज्ञप्ती शुल्क असल्यास, ती कार्यालय प्रमुखाला दोन महिन्यांच्या आत कळवील. कार्यालय प्रमुखास शिल्लक अनुज्ञप्ती शुल्कच्या वसुली संबंधात ठराविक तारखेपूर्वी काहीही न कळल्यास, शासकीय निवासस्थान मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्याकडून त्याच्या सेवानिवृत्तीपूर्वीच्या **आठ महिन्यांच्या** कालावधीबाबत वसुली योग्य कोणतीही अनुज्ञप्ती शुल्क येणे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि कोणतेही उपदान रोखून धरण्यात येणार नाही.

(२) नंतरच्या **आठ महिन्यांची** म्हणजेच शासकीय निवासस्थान मिळालेल्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यंतची अनुज्ञप्ती शुल्क, त्या कर्मचाऱ्याच्या वेतन व भत्त्यांमधून दरमहा वसूल करण्यात येत असल्याबद्दल कार्यालय प्रमुख खात्री करून घेईल.

(३) संबंधित कार्यकारी अभियंत्याने, पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या कालावधीच्या संबंधात वसुलीयोग्य अनुज्ञप्ती शुल्कची रक्कम कळविलेली असेल तेव्हा कार्यालय प्रमुख, शासकीय निवासस्थान मिळालेल्या कर्मचाऱ्याच्या चालू वेतन व भत्त्यांमधून बाकी राहिलेली अनुज्ञप्ती शुल्क हप्त्याने वसूल करण्यात येत असल्याबाबत खात्री करून घेईल. जेव्हा संपूर्ण रक्कम वेतन व भत्त्यांमधून वसूल होत नसेल तेव्हा शिल्लक रक्कम, उपदानाचे प्रदान प्राधिकृत करण्यापूर्वी त्यामधून वसूल केली जाईल.

(४) संबंधित कार्यकारी अभियंता, शासकीय निवासस्थान मिळालेल्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तिच्या तारखेनंतर अनुज्ञेय कालावधीपर्यंत शासकीय निवासस्थान ठेवून घेण्याबद्दलची अनुज्ञप्ती शुल्क देखील कार्यालय प्रमुखास कळवील. कार्यालय प्रमुख, ती अनुज्ञप्ती शुल्क आणि वसूल न झालेली पोट-नियम (३) मध्ये नमूद केलेली असल्यास, कोणतीही अनुज्ञप्ती शुल्क, उपदानाच्या रकमेशी समायोजित करील.

(५) एखाद्या विशिष्ट प्रकरणी, कार्यकारी अभियंत्याला शिल्लक राहिलेल्या अनुज्ञप्ती शुल्कची रक्कम निर्धारित करणे शक्य नसेल तर, तो कार्यकारी अभियंता, उपदानाच्या दहा टक्के रक्कम, पुढील सूचना देण्यात येईपर्यंत, रोखून ठेवण्याबाबत कार्यालय प्रमुखाला कळवील.

(६) शासकीय निवासस्थान मिळालेल्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेनंतर एक महिन्याच्या अनुज्ञेय कालावधीहून अधिक मुदतीसाठी शासकीय निवासस्थान ताब्यात ठेवल्याबद्दलची अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंत्याची असेल.

**टीप**:—या नियमाच्या प्रयोजनार्थ अनुज्ञप्ती शुल्कामध्ये, शासकीय कर्मचाऱ्याने शासकीय निवासस्थानास किंवा तेथील जोडणी कामास कोणतेही नुकसान किंवा हानी पोहोचविल्याबद्दल त्याने द्यावयाच्या इतर कोणत्याही आकारांचा समावेश असेल.

**४६. शासकीय निवासस्थानाशी संबंधित येणे रकमांव्यतिरिक्त इतर येणे रकमांचे समायोजन व वसुली**.— (१) नियम ४४ मधील स्पष्टीकरण (१) च्या खंड (बी) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, शासकीय निवासस्थानाशी संबंधित असलेल्या येणे रकमांव्यतिरिक्त इतर येणे रकमांच्या बाबतीत कार्यालय प्रमुख, शासकीय कर्मचारी नियत वयमानानंतर ज्या तारखेस सेवानिवृत्त होणार असेल ती तारीख, किंवा ज्या तारखेस तो निवृत्तीपूर्व रजेवर जाणार असेल ती तारीख, यापैकी जी अगोदरची असेल त्या तारखेच्या एक वर्ष अगोदर येणे रकमा निर्धारित करण्यासंबंधात कार्यवाही करील.

(२) पोट-नियम (१) मध्ये नमूद करण्यात आलेल्या शासकीय येणे रकमा निर्धारित करण्याचे काम कार्यालय प्रमुख, शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेच्या आठ महिने अगोदर पूर्ण करील.

(३) पोट-नियम (२) खाली निर्धारित करण्यात आलेल्या आणि त्यानंतर निदर्शनास आलेल्या व शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यन्त शिल्लक राहिलेल्या येणे रकमा, शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याला देय होणाऱ्या सेवानिवृत्ति उपदानाच्या रकमेशी समायोजित करण्यात येतील.

## प्रकरण सात

## सेवेत असताना मृत्यू पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या संबंधात मृत्यू उपदान यांचे निर्धारण व प्राधिकृती

**४७. मृत्यू उपदान याविषयींच्या मागण्या प्राप्त करुन घेणे**. — (१) शासकीय कर्मचारी सेवेत असताना मृत्यू पावल्याची माहिती मिळाल्यावर कार्यालय प्रमुख,

(क) (एक) मृत शासकीय कर्मचाऱ्याने उपदान मिळण्याकरिता एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना नामनिर्देशित केले होते काय, आणि

(दोन) मृत शासकीय कर्मचाऱ्याने कोणतेही नामनिर्देशन केले नसेल तर किंवा केलेले नामनिर्देशन अस्तित्वात नसेल तर उपदान कोणत्या व्यक्तीला अथवा व्यक्तींना देय होऊ शकेल, याबाबत खात्री करून घेईल.

(ख) त्यानंतर कार्यालय प्रमुख नमुना १० मध्ये दावा सादर करण्याकरिता नमुना ९ या नमुन्यात संबंधित व्यक्तीला लिहून कळवील.

(२) मृत्यूच्या तारखेस शासकीय कर्मचाऱ्याच्या ताब्यात शासकीय निवासस्थान असेल तर कार्यालय प्रमुख, संबंधित कार्यकारी अभियंत्याला, नियम ५३ च्या पोट-नियम (१) च्या तरतुदीनुसार "ना-मागणी प्रमाणपत्र" देण्यासंबंधात कळवील.

**४८. नमुना ११ ची परिपूर्ती**. – (१) (क) नियम ४७ च्या तरतुदींनुसार कुटुंबाकडून दावा किंवा दावे प्राप्त करण्यासाठी कार्यवाही करताना, कार्यालय प्रमुख, एकाच वेळी नमुना ११ ची पूर्तता करण्याचे काम हाती घेईल आणि ज्या दिनांकास शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या दिनांकाबाबत पूर्वसूचना प्राप्त झाली असेल, त्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत हे काम पूर्ण करील.

(ख) कार्यालय प्रमुख, मृत शासकीय कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक तपासून पाहील व त्यामध्ये, संपूर्ण सेवेच्या संबंधात सेवा पडताळणी प्रमाणपत्रांची नोंद करण्यात आली आहे किंवा कसे याबाबत स्वतःची खात्री करून घेईल.

(ग) (एक) पडताळणी न झालेले असे सेवेचे काही कालावधी असल्यास, कार्यालय प्रमुख सेवापुस्तकातील उपलब्ध नोंदीच्या आधारे, पडताळणी न झालेला कालावधी हा, पडताळणी झालेला कालावधी म्हणून मान्य करील. या प्रयोजनाकरिता कार्यालय प्रमुख, त्याला सहज उपलब्ध होईल अशा कोणत्याही इतर संबंधित माहितीवर विसंबून राहू शकेल.

(दोन) पडताळणी न झालेला सेवेचा कालावधी मान्य करताना, ती संतत सेवा होती आणि सेवेतून बडतर्फ केल्यामुळे, काढून टाकण्यात आल्यामुळे किंवा सेवेचा राजीनामा देण्यात आल्यामुळे अथवा संपात भाग घेतल्यामुळे त्याला ती गमवावी लागली नव्हती याबाबत कार्यालय प्रमुख खात्री करून घेईल.

(२) (क) मृत्यू उपदान करिता वित्तलब्धी निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ, कार्यालय प्रमुख शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या तारखेपूर्वी जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीतील वेतन बिनचूक आहे हे पाहण्यापुरतेच पडताळणीचे काम मर्यादित ठेवील.

(ख) शासकीय कर्मचारी, तो मृत्यू पावला त्या तारखेस असाधारण रजेवर असेल तर, असाधारण रजा सुरू झाल्याच्या तारखेपूर्वीच्या जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीत त्याने घेतलेले वित्तलब्धी बिनचूक आहे हे पडताळून पाहण्यात येईल.

(३) अर्हताकारी सेवा व अर्हताकारी वित्तलब्धी निश्चित करण्याची प्रक्रिया, शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूची तारीख कळल्याच्या तारखेनंतर एक महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल आणि त्यानुसार मृत्यू उपदान यांची गणना करण्यात येईल.

**४९. सेवा अभिलेख अपूर्ण असतील तेव्हा मृत्यू उपदान यांचे निर्धारण**. –सेवापुस्तके योग्यरीतीने ठेवण्यात आली पाहिजे आणि एखाद्या प्रकरणी सेवापुस्तक योग्यरीत्या ठेवण्यात आले नसेल आणि

कार्यालय प्रमुखाला, पडताळणी न झालेला सेवेचा कालावधी सेवापुस्तकातील नोंदीच्या आधारे पडताळणी झालेला कालावधी म्हणून मान्य करणे शक्य नसेल, त्या प्रकरणी कार्यालय प्रमुख, संपूर्ण सेवा कालावधीच्या पडताळणीसाठी प्रतीक्षा करणार नाही आणि मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या संबंधात मृत्यू उपदानाच्या रकमेचे निर्धारण पुढील रीतीने करील:-

(एक) जर मृत शासकीय कर्मचाऱ्याने केलेली संपूर्ण सेवा पडताळणी करून स्वीकारण्यायोग्य नसेल, तर मृत्यू उपदानाची रक्कम नियम २१ च्या पोट-नियम (२) नुसार तात्पुरत्या स्वरूपात निश्चित केली जाईल, जी शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या दिनांकालगत पूर्वीच्या पडताळणी झालेल्या व स्वीकारलेल्या सलग सेवेच्या कालावधीतील अर्हताकारी सेवेच्या लांबीच्या आधारावर असेल आणि अशा प्रकारे निश्चित केलेली मृत्यू उपदानाची रक्कम लाभार्थ्यांना तात्पुरत्या स्वरूपात, शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या दिनांकाची पूर्वसूचना प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्राधिकृत केली जाईल;

(दोन) उपदानाची अंतिम रक्कम कार्यालय प्रमुखाद्वारे संपूर्ण सेवा कालावधीच्या स्वीकार व पडताळणीनंतर निश्चित केली जाईल, ही पडताळणी कार्यालय प्रमुखाकडून, तात्पुरत्या मृत्यू उपदानाच्या प्रदानासाठी ज्या दिनांकास आदेश निर्गमित करण्यात आले त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत केले जाईल आणि त्यानंतर, मृत्यू उपदानाच्या अंतिम रकमेच्या निर्धारणाचा परिणाम म्हणून प्रदेय असणारी उर्वरित रक्कम, कोणतीही असल्यास, त्यानंतर लाभार्थ्यांना प्राधिकृत केली जाईल.

**५०. लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे नमुना ८ आणि नमुना ११ पाठविणे**. – (१) संबंधित दावा किंवा दावे प्राप्त झाल्यानंतर कार्यालय प्रमुख, **नमुना ११** ची बाब क्रमांक ९ पूर्ण करील आणि **नमुना ८**मधील उपरिपत्रासह उक्त नमुन्याची मूळ प्रत व यथोचितरीत्या पूर्ण भरून अद्यावत केलेले त्या शासकीय कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक आणि ज्या सेवेबाबत मागणी करण्यात आली असेल त्या सेवेच्या पडताळणीसाठी ज्यावर विसंबून राहता येईल असे इतर कोणतेही कागदपत्र, लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे पाठवील. कार्यालय प्रमुखाने हे काम दावा प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत केले पाहिजे.

(२) कार्यालय प्रमुख उपरोक्त नमुना ११ ची एक प्रत त्याच्या कार्यालयीन अभिलेखाकरिता ठेवून घेईल.

(३) कार्यालय प्रमुख, मृत शासकीय कर्मचाऱ्याकडून येणे असलेल्या खालील शासकीय रकमांचा तपशील लेखापरीक्षा अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणील. त्या रकमा येणेप्रमाणे:-

(क) नियम ५३ च्या अर्थानुसार निश्चित व निर्धारित केलेल्या आणि उपदानाचे प्रदान करण्यापूर्वी त्यामधून वसूल करण्याजोग्या शासकीय येणे रकमा.

(ख) आतापर्यंत निर्धारित करण्यात न आलेल्या शासकीय येणे रकमांच्या समायोजनासाठी अंशतः आणि उपदानाची निश्चित केली जाणारी अंतिम रक्कम विचारात घेता समायोजनासाठी वाव राहावा म्हणून अंशतः राखून ठेवावयाची उपदानाची रक्कम.

(ग) खंड (ख) च्या प्रयोजनार्थ रोखून ठेवावयाची उपदानाची कमाल रक्कम, उपदानाच्या रकमेच्या १० टक्के इतक्या रकमेपर्यंत मर्यादित असेल.

(४) (क) जेथे नमुना ११ पूर्ण करण्यात आला आहे आणि लाभार्थी किंवा लाभार्थ्यांकडून संबंधित नमुन्यांमध्ये दावा किंवा दावे प्राप्त झालेले नाहीत, तेथे कार्यालय प्रमुख नमुना ११ आणि पोट-नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले दस्तऐवज, दाव्याशिवाय किंवा दाव्यांशिवाय लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे पाठवील.

(ख) कार्यालय प्रमुखास दावा किंवा दावे प्राप्त होताच, ते तात्काळ लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे अग्रेषित केले जातील.

(५) (क) जेथे नमुना ११ पूर्ण करण्यात आला आहे आणि मृत्यू उपदानातून वसूल करावयाच्या शासकीय देय रक्कम आकारली गेलेली नाही, तेथे कार्यालय प्रमुख उक्त नमुन्याच्या भाग एक मधील बाब ९ रिक्त ठेवून नमुना ११ आणि पोट-नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले दस्तऐवज लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे पाठवील.

(ख) कार्यालय प्रमुखाने मृत्यू उपदानातून वसूल करावयाच्या शासकीय देय रकमांची आकारणी केली की, तात्काळ लेखा अधिकाऱ्याद्वारे नमुना ११ च्या भाग एक मधील बाब ९ भरण्यात यावी या विनंतीसह लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे अग्रेषित केल्या जातील.

**५१. तात्पुरत्या मृत्यू उपदानाची मंजुरी, आहरण आणि संवितरण.** – (१) नियम ५० मध्ये विनिर्दिष्ट केलेले दस्तऐवज संबंधित लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे पाठवल्यानंतर, कार्यालय प्रमुख या प्रकरणाच्या तरतुदींनुसार निर्धारित केलेल्या उपदानाच्या शंभर टक्के रकमेचे आहरण करील आणि या प्रयोजनासाठी कार्यालय प्रमुख पुढील कार्यपद्धती अवलंबील:-

(क) तो मागणीदाराच्या किंवा मागणीदारांच्या नांवे मंजुरीपत्र पाठवील व त्यात निर्धारित करण्यात आलेली तात्पुरत्या कुटुंब निवृत्तिवेतनाची आणि शंभर टक्के उपदानाची रक्कम नमूद करून या पत्राची एक प्रत लेखापरीक्षा अधिकाऱ्याला पाठवील,

(ख) तो, त्या मंजुरीपत्रामध्ये, नियम ५० च्या पोट-नियम (३) अन्वये उपदानाच्या रकमेमधून वसुलीयोग्य असलेली रक्कम दर्शवील.

(ग) मंजुरीपत्र निर्गमित केल्यानंतर तो शासकीय येणे रकमा शंभर टक्के उपदानाच्या रकमेमधून वजा करून उरलेली उपदानाची रक्कम, अधिदान व लेखा अधिकाऱ्याकडे देयक सादर करून आहरण करील.

(२) कार्यालय प्रमुख, पोट-नियम (१) खाली उपदान काढल्यानंतर ते ताबडतोब संवितरित करील.

(३) कार्यालय प्रमुख उपदानाची रक्कम, मागणीदाराला किंवा मागणीदारांना प्रदान केल्यानंतर त्याबाबत लवकरात लवकर लेखापरीक्षा अधिकाऱ्याला कळवील.

**५२. लेखापरीक्षा अधिकाऱ्यांकडून शिल्लक उपदानास प्राधिकृती**. – (१) नियम ५० च्या पोट-नियम (१) मध्ये नमूद करण्यात आलेली कागदपत्रे मिळाल्यानंतर, लेखापरीक्षा अधिकारी एक महिन्याच्या आत, आवश्यक ती तपासणी करील व **नमुना ११** च्या भाग-दोन चा विभाग-१ पूर्ण करील व उपदानाची रक्कम निर्धारित करील.

(२) (क) लेखापरीक्षा अधिकारी मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या नावे कोणतीही बाकी रक्कम असल्यास, तिचे समायोजन केल्यानंतर उपदानाची शिल्लक रक्कम निर्धारित करील.

(ख) लेखापरीक्षा अधिकारी, कार्यालय प्रमुखाला, खंड (क) खाली निर्धारित करण्यात आलेली उपदानाची शिल्लक रक्कम कळवील व त्याबरोबरच ज्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना तात्पुरते उपदान देण्यात आले असेल त्या व्यक्तीची किंवा व्यक्तींची उपदानाची उर्वरित रक्कम काढून संवितरित करावी अशी सूचना देईल.

(ग) कार्यालय प्रमुखाने, नियम ५३ चा पोट-नियम (१) च्या खंड (ख) अन्वये रोखून ठेवण्यात आलेल्या उपदानाच्या रकमेचे, नियम ५३ चा पोट-नियम (१) च्या खंड (आठ) मध्ये नमूद करण्यात आलेल्या बाकी अनुज्ञप्ती शुल्काशी समायोजन केल्यानंतर कोणतीही शिल्लक रक्कम असल्यास, ती, उपदान प्रदान करण्यात आलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना परत करण्यात येईल.

(घ) उपदानाच्या शिल्लक रकमेचे आहरण, अधिदान व लेखा अधिकाऱ्याकडे देयक सादर करून केले जाऊ शकते आणि त्याचे संवितरण कार्यालय प्रमुखाद्वारे ज्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना तात्पुरते उपदान दिले गेले होते त्यांना केले जाऊ शकते.

(३) (क) कार्यालय प्रमुखाने संवितरित केलेली उपदानाची रक्कम, लेखापरीक्षा अधिकाऱ्याने अंतिमरीत्या निर्धारित केलेल्या रकमेपेक्षा अधिक असल्याचे सिद्ध झाले तर अशी अधिक रक्कम लाभाधिकाऱ्याने परत करण्याची आवश्यकता नाही.

(ख) प्रत्यक्षात अनुज्ञेय असलेल्या उपदानाच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम संवितरित केली जाण्याचे प्रसंग कमीत कमी येतील याची कार्यालय प्रमुख, खात्री करून घेईल आणि अतिरिक्त प्रदान करण्यास जबाबदार असलेले अधिकारी त्यासाठी उत्तरदायी असतील.

**५३. शासकीय येणे रकमांचे समायोजन**. — (१) **शासकीय निवासस्थानासंबंधातील येणे रकमा** — (एक) शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या तारखेस शासकीय निवासस्थान त्याच्या ताब्यात असेल तर, त्याच्या मृत्यूची माहिती मिळाल्यानंतर कार्यालय प्रमुख, मृत्यू उपदान प्राधिकृत करण्यास विलंब होऊ नये म्हणून अशी माहिती मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत, संबंधित कार्यकारी अभियंत्याला "ना-मागणी प्रमाणपत्र" देण्यासंबंधी लिहून कळवील. "ना-मागणी प्रमाणपत्र" देण्यासंबंधात कार्यकारी अभियंत्याला कळविताना कार्यालय प्रमुख खालील माहिती देखील दोन प्रतींमध्ये (एक प्रत भाडे कक्षाला दुसरी प्रत वाटप कक्षाला) पाठवील.

(अ) मृत शासकीय कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम;

(ब) निवासस्थानाचा तपशील (निवासस्थान क्रमांक, प्रकार व ठिकाण);

(क) शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूची तारीख;

(ड) शासकीय कर्मचारी मृत्यूच्या तारखेस रजेवर होता किंवा कसे आणि असल्यास, रजेचा कालावधी व रजेचे स्वरूप;

(ई) शासकीय कर्मचाऱ्याला भाडेमाफ निवासस्थान मिळाले होते काय;

(फ) मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या वेतन व भत्त्यांमधून ज्या कालावधीपर्यंत अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्यात आली असेल तो कालावधी आणि वसूलीचा मासिक दर तसेच अखेरची वसुली ज्या वेतन देयकामधून करण्यात आली असेल त्या वेतन देयकाचा तपशील;

(ग) मृत्यूच्या तारखेपर्यंतची अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्यात आली नसेल आणि शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या तारखेपासून अनुज्ञेय कालवधीकरिता शासकीय निवासस्थान ठेवून घेण्याची त्याच्या कुटुंबाची इच्छा असेल तर-

(अ) ज्या कालावधीची अनुज्ञप्ती शुल्क अजूनही वसूल करावयाची राहिलेली आहे तो कालावधी;

(ब) प्रमाण भाडे बिलाच्या आधारे निश्चित करावयाची (अ) मधील कालावधीच्या संबंधातील अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम;

(क) मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंबाने, शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या तारखेनंतर एक महिन्याच्या सवलतीच्या कालावधीसाठी शासकीय निवासस्थान ठेवून

घेण्यासंबंधात प्रमाण भाडे बिलाच्या आधारे निश्चित करावयाची अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम;

(ड) मृत्यू उपदानामधून वसूल करण्याचे योजिलेली, (ब) व (क) मध्ये नमूद करण्यात आलेली अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम;

(ई) निवासस्थान मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्या नावे येणे असलेल्या अनुज्ञप्ती शुल्काच्या वसुलीबाबत संबंधित कार्यकारी अभियंत्याकडील पूर्व संदर्भाचा तपशील व त्याबाबत करण्यात आलेली कार्यवाही.

(दोन) कार्यालय प्रमुख, खंड (एक) खाली संबंधित कार्यकारी अभियंत्याला कळविण्यात आलेली अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम, मृत्यू उपदानाच्या रकमेमधून वसूल करील.

(तीन) एक महिन्याच्या अनुज्ञेय कालावधीनंतर शासकीय निवासस्थान ताब्यात ठेवल्याबद्दलची अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंत्याची असेल.

(चार) संबंधित कार्यकारी अभियंता, मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या नावे खंड (एक) मध्ये नमूद करण्यात आलेल्या अनुज्ञप्ती शुल्क व्यतिरिक्त त्याच्याकडून येणे असलेली इतर अनुज्ञप्ती शुल्क निर्धारित करण्याच्या दृष्टीने आपल्याकडील अभिलेखाची छाननी करील. कोणतीही वसुली आढळून आल्यास, ती रक्कम आणि अशी वसुलीची रक्कम किंवा रकमा, ज्या एका किंवा अधिक कालावधींशी संबंधित असतील ते कालावधी, खंड (एक), अन्वये शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूसंबंधी माहिती मिळाल्यानंतर तीन महिन्याच्या आत कार्यालय प्रमुखाला कळविण्यात येतील.

(पाच) कार्यालय प्रमुख, खंड (चार) अन्वये माहिती प्राप्त झाल्यानंतर, कार्यकारी अभियंत्याद्वारे कळविलेली रक्कम किंवा कार्यकारी अभियंत्याने कोणतीही निश्चित रक्कम कळविली नसल्यास, मृत्यू उपदानाच्या १० टक्के रक्कम रोखून ठेवतील.

(सहा) अनुज्ञप्ती शुल्काच्या वसुलीसंबंधात खंड (चार) मध्ये विहित करण्यात आलेल्या कालावधीत कार्यालय प्रमुखाला कोणतीही माहिती मिळाली नाही तर मृत शासकीय कर्मचाऱ्याकडून वसूल करण्याजोगी कोणतीही रक्कम नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि रोखून ठेवण्यात आलेली उपदानाची रक्कम, मृत्यू उपदानाची रक्कम प्रदान करण्यात आलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना देण्यात येईल.

(सात) मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या नावे येणे असलेल्या अनुज्ञप्ती शुल्क संबंधात खंड (चार) अन्वये संबंधित कार्यकारी अभियंत्याकडून कार्यालय प्रमुखाला माहिती मिळाल्यास कार्यालय प्रमुख, बाकी राहिलेली अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम, मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या वेतन व भत्यांमधून वसूल करण्यात आली किंवा कसे हे, वेतनपटावरून पडताळून पाहील. पडताळणी केल्यानंतर बाकी म्हणून

दर्शविण्यात आलेली अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम संबंधित कार्यकारी अभियंत्याकडून अगोदरच वसूल करण्यात आली असल्याचे आढळून आल्यास कार्यालय प्रमुख अनुज्ञप्ती शुल्काची आवश्यक ती वसुली ज्या वेतन देयकामधून करण्यात आली असेल त्या वेतन देयकाकडे संबंधित कार्यकारी अभियंत्याचे लक्ष वेधील आणि पोट-नियम (२) च्या तरतुदीच्या अधिन राहून खंड (पाच) अन्वये रोखून ठेवण्यात आलेली उपदानाची रक्कम, मृत्यू उपदान प्रदान करण्यात आलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना देण्यासंबंधात कार्यवाही करील.

(आठ) अनुज्ञप्ती शुल्काची बाकी राहिलेली रक्कम मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या वेतन व भत्यांमधून वसूल करण्यात आली नसेल तर, ती रक्कम खंड (पाच), अन्वये रोखून ठेवण्यात आलेल्या उपदानाच्या रकमेशी समायोजित करण्यात येईल आणि कोणतीही रक्कम बाकी असल्यास ती, मृत्यू उपदानाची रक्कम प्रदान करण्यात आलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना परत करण्यात येईल.

(२) **पोट-नियम (१) मध्ये नमुद केलेल्या रकमांव्यतिरिक्त येणे रकमा** – शासकीय कर्मचारी मृत्यू पावल्यासंबंधीची माहिती कळल्यानंतर एक महिन्यांच्या आत शासकीय निवासस्थानाशी संबंधित असलेल्या येणे रकमांव्यतिरिक्त, नियम ४६ मध्ये नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही येणे रकमा, मृत शासकीय कर्मचाऱ्याकडून वसूल करण्याजोग्या आहेत का, याबाबत कार्यालय प्रमुख खात्री करून घेईल, अशा खात्री करून घ्यावयाच्या रकमा मृत शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबास देय असलेल्या मृत्यू उपदानाच्या रकमेमधून वसूल करण्यात येतील.

**५४. शासकीय कर्मचारी प्रतिनियुक्तीवर असताना मृत्यू पावल्यास मृत्यू उपदानाचे प्रदान**. – (१)राज्य शासनाच्या दुसऱ्या विभागामध्ये/कार्यालयामध्ये प्रतिनियुक्तीवर असताना मृत्यू पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत, या प्रकरणाच्या तरतुदींनुसार कुटुंब निवृत्तिवेतन व मृत्यू उपदान प्राधिकृत करण्यासंबंधीची कार्यवाही, त्याची सेवा उसनवारीने घेणाऱ्या विभागाच्या कार्यालय प्रमुखाकडून केली जाईल.

(२) केंद्र शासनाकडे किंवा स्वीयेत्तर सेवेमध्ये प्रतिनियुक्तीवर असताना मृत्यू पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत, या प्रकरणाच्या तरतुदींनुसार मृत्यू उपदान प्राधिकृत करण्यासंबंधातील कार्यवाही त्या शासकीय कर्मचाऱ्याची केंद्र शासनाकडे किंवा स्वीयेत्तर सेवेमध्ये प्रतिनियुक्ती मंजूर करणाऱ्या संवर्ग प्राधिकाऱ्याच्या कार्यालय प्रमुखाकडून करण्यात येईल.

## प्रकरण आठ

## संकीर्ण

**५५. उपदान कोणत्या चलनात प्रदेय असते**. – या नियमाखाली अनुज्ञेय असलेली उपदान भारतातच केवळ रुपयांमध्ये प्रदेय होतील.

५६. **उपदान प्रदानाची रीत**. – या नियमांमध्ये अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीज करून, उपदान ठोक रकमेमध्ये प्रदान करण्यात येईल.

५७. **कोषागार नियम लागू करणे**. – या नियमांमध्ये अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीज करून, राज्य शासनाचे कोषागार नियम उपदानाच्या प्रदानाच्या कार्यपद्धतीस लागू होतील.

५८. **अन्वयार्थ लावणे**. – जेव्हा या नियमांच्या अन्वयार्थ लावण्याच्या संबंधात कोणतीही शंका उद्भवेल तेव्हा, या नियमांचे अर्थविवरण करण्याचा हक्क शासन स्वतःकडे राखून ठेवीत आहे.

५९. **नियम शिथिल करण्याचा अधिकार**.- जेव्हा या नियमांपैकी कोणताही नियम अंमलात आणल्यामुळे कोणत्याही विशिष्ट प्रकरणात गैरवाजवी अडचण होत आहे अशी शासनाच्या कोणत्याही विभागाची खात्री पटेल तेव्हा, तो विभाग लेखी कारणे नमूद करुन, त्या प्रकरणावर न्याय व समन्याय रीतीने कार्यवाही करण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल अशा मर्यादेपर्यंत आणि अशा अपवादांच्या व अटींच्या अधिन राहून, त्या नियमातून आदेशाद्वारे सूट देऊ शकेल किंवा त्या नियमाची आवश्यकता शिथिल करु शकेलः

परंतु, वित्त विभागाच्या सहमतीखेरीज असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

६०. **अवशिष्ट तरतूदी**. – (१) या नियमांमध्ये स्पष्टपणे समावेश न केलेल्या कोणत्याही संबंधित प्रश्नांचा निर्णय, महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची अंमलबजावणी) नियम, २०२६ यामधील संबंधित तरतुदींनुसार किंवा शासनाने काढलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशानुसार घेण्यात येईल; परंतु अशा तरतुदी, या नियमांतील तरतुदींशी विसंगत किंवा प्रतिकूल असणार नाहीत.

(२) राज्य शासन, ज्या बाबींसाठी या नियमांमध्ये कोणतीही तरतूद केलेली नाही किंवा करण्यात आलेली नसल्याचे मानण्यात आले आहे त्या कोणत्याही बाबीचे नियमन करण्यासाठी आदेश काढू शकेल किंवा सूचना देऊ शकेल; आणि असे नियम करण्यात येईपर्यंत, वेळोवेळी काढलेल्या आदेशांनुसार किंवा सूचनांनुसार अशा बाबींचे नियमन करण्यात येईल.

६१. **निरसन व व्यावृत्ती**.- या नियमांच्या प्रारंभानंतर, अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेला प्रत्येक आदेश, सूचना किंवा कार्यालयीन ज्ञापन, या नियमांमध्ये अंतर्भूत असलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद केलेली असेल तेथवर, अंमलात असण्याचे बंद होईल. ते आदेश, सूचना किंवा कार्यालयीन ज्ञापन यानुसार केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही या नियमांच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

**नमुना १**

**उपदानासाठी सेवा पडताळणी प्रमाणपत्र**

[नियम २०(१) पहा]

क्रमांक.....

महाराष्ट्र शासन

विभाग/कार्यालय.....

दिनांकः- / /

लेखापरीक्षा अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करून असे प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी_____(नाव व पदनाम) यांनी खालील तपशीलानुसार, वर्ष_____ (दिनांक)_____ रोजी महिने_____ दिवसांची अर्हताकारी सेवा पूर्ण केली आहे. त्याच्या सेवा दस्तऐवजांच्या आधारे व सध्या अंमलात असलेल्या अर्हताकारी सेवेसंबंधीच्या नियमांनुसार सेवेची पडताळणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत उपदानाचे प्रदान) नियम, २०२६ याच्या नियम २० च्या पोट-नियम (१) व (२) अन्वये केलेली सेवेची पडताळणी अंतिम मानली जाईल व ती, उपदानाकरिता सेवा पात्र ठरण्याच्या अटींसंबंधीच्या नियमांमध्ये व आदेशांमध्ये, नंतरच्या बदलाद्वारे आवश्यक असल्याशिवाय पुन्हा केली जाणार नाही.

**अर्हताकारी सेवेचा तपशील**

| अनु. क्र. | विभाग/कार्यालयाचे नाव | पासून | पर्यंत | अर्हताकारी सेवेचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

कार्यालय प्रमुखाची सही व शिक्का

प्रति

श्री/श्रीमती/कुमारी_____

(नाव व पदनाम)

**नमुना २**

[नियम २२ (१) पहा]

**सेवानिवृत्ति उपदान/मृत्यू उपदानाकरिता नामनिर्देशन**

**शासकीय कर्मचाऱ्याला कुटुंब असेल आणि त्यापैकी एका किंवा एकापेक्षा अधिक सदस्यांस नामनिर्देशित करण्याची त्याची इच्छा असेल तेव्हा--**

मी, ....., याद्वारे खाली निर्दिष्ट केलेल्या माझ्या कुटुंबातील सदस्याला/सदस्यांना नामनिर्देशित करीत आहे अणि सेवेत असताना माझा मृत्यू झाल्यास, महाराष्ट्र शासनाकडून मंजूर करण्यात येईल असे, खाली विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंतचे कोणतेही उपदान स्वीकारण्याचा अधिकार आणि सेवानिवृत्तीनंतर माझा मृत्यू झाल्यास, त्यावेळी अदत्त राहील असे अनुज्ञेय झालेले, खाली विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंतचे उपदान स्वीकारण्याचा अधिकार त्याला/त्यांना प्रदान करीत आहेः--

| मूळ नामनिर्देशित सदस्य | | | | पर्यायी नामनिर्देशित सदस्य | |
|---|---|---|---|---|---|
| नामनिर्देशित व्यक्तीचे/ व्यक्तींची नाव (नावे) व पत्ता (पत्ते) | शासकीय कर्मचाऱ्याशी असलेले नाते | वय | प्रत्येक सदस्याला देय असेल अशी उपदानाची रक्कम किंवा त्याचा हिस्सा* | नामनिर्देशित सदस्य हा शासकीय कर्मचाऱ्याच्या अगोदर मृत्यू पावला किंवा शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर परंतु उपदानाची रक्कम प्राप्त होण्यापूर्वी मृत्यू पावला, तर त्याबाबतीत नामनिर्देशित सदस्याला प्रदान केलेला अधिकार ज्या कोणत्याही, असल्यास, व्यक्तीला/व्यक्तींना प्राप्त होईल त्या व्यक्तीचे/व्यक्तींची नावे, पत्ते, नाते व वये | प्रत्येक सदस्याला देय असेल अशी उपदानाची रक्कम किंवा त्याचा हिस्सा** |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

*उपदानाच्या संपूर्ण रकमेचा समावेश होईल अशा प्रकारे हा स्तंभ भरावा.

**या स्तंभामध्ये दर्शविलेल्या उपदानाच्या रकमेत/हिश्श्यात मूळ नामनिर्देशित सदस्याला/सदस्यांना देय असलेल्या संपूर्ण रकमेचा/हिश्श्याचा समावेश असला पाहिजे.

या नामनिर्देशनामुळे, मी यापूर्वी दिनांक ..... रोजी केलेले नामनिर्देशन रद्द ठरले आहे.

**टीप**--(एक) शासकीय कर्मचाऱ्याने नामनिर्देशनावर सही केल्यानंतर त्यामध्ये आणखी कोणतेही नाव समाविष्ट करता येऊ नये म्हणून शेवटची नोंद केल्यावर रिकाम्या जागेत तिरप्या रेषा काढाव्यात.

(दोन) लागू नसलेला मजकूर खोडावा.

ठिकाण..... दिनांक .....

सहीकरिता साक्षीदार:

(१) .....

(२) .....

शासकीय कर्मचाऱ्याची सही.

(कार्यालय प्रमुख/लेखापरीक्षा अधिकारी यांनी भरावयाचे)

नामनिर्देशन करणाऱ्या व्यक्तीचे नाव : .....

पदनाम :

कार्यालय :

कार्यालय प्रमुख/लेखापरीक्षा अधिकारी यांची सही.

दिनांक :

पदनाम :

**कार्यालय प्रमुख/लेखापरीक्षा अधिकारी यांना नामनिर्देशनाचा नमुना मिळाल्याबद्दलच्या पोचपावतीचा नमुना**

.....यांस,

.....

.....

महोदय/महोदया,

आपल्या उपदानाच्या संबंधात, दिनांक ..... रोजी केलेले नामनिर्देशनपत्र/यापूर्वीचे ..... नमुन्यातील दिनांक ..... रोजी रद्द केलेले नामनिर्देशन पत्र मिळाले असून, ते यथोचितरीत्या अभिलेखामध्ये ठेवण्यात आले आहे.

ठिकाण: ..... कार्यालय प्रमुख/लेखापरीक्षा अधिकारी यांची सही.

दिनांक : .....

पदनाम :

**टीप**-नामनिर्देशित केलेल्या सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने शासकीय कर्मचाऱ्याने नामनिर्देशनपत्रे, संबंधित नोटिसा व पोचपावत्या यांच्या प्रती सुरक्षितपणे ठेवाव्यात म्हणजे त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या लाभाधिकाऱ्यांना त्या प्रती उपलब्ध होऊ शकतील.

**नमुना ३**

[नियम २२ (१) पहा]

**सेवा निवृत्ती उपदान/मृत्यू उपदानाकरिता नामनिर्देशन**
**शासकीय कर्मचाऱ्याला कुटुंब नसेल आणि एक किंवा एकापेक्षा अधिक सदस्यांस नामनिर्देशित करण्याची त्याची इच्छा असेल तेव्हा--**

माझे कुटुंब नसल्याने, मी,.....,याद्वारे खाली निर्दिष्ट केलेल्या सदस्याला/सदस्यांना नामनिर्देशित करीत आहे आणि सेवेत असताना माझा मृत्यू झाल्यास महाराष्ट्र शासनाकडून मंजूर करण्यात येईल असे, खाली विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंतचे कोणतेही उपदान स्वीकारण्याचा अधिकार आणि सेवानिवृत्तीनंतर माझा मृत्यू झाल्यास, त्यावेळी अदत्त राहील असे, अनुज्ञेय झालेले, खाली विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंतचे उपदान स्वीकारण्याचा अधिकार त्याला/त्यांना प्रदान करीत आहे :--

| मूळ नामनिर्देशित सदस्य | | | | पर्यायी नामनिर्देशित सदस्य | |
|---|---|---|---|---|---|
| नामनिर्देशित व्यक्तीचे/ व्यक्तींची नाव (नावे) व पत्ता (पत्ते) | शासकीय कर्मचाऱ्याशी असलेले नाते | वय | प्रत्येक सदस्याला देय असेल अशी उपदानाची रक्कम किंवा त्याचा हिस्सा* | नामनिर्देशित सदस्य हा शासकीय कर्मचाऱ्याच्या अगोदर मृत्यू पावला किंवा शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर परंतु उपदानाची रक्कम प्राप्त होण्यापूर्वी मृत्यू पावला तर त्याबाबतीत नामनिर्देशित सदस्याला प्रदान केलेला अधिकार ज्या कोणत्याही, असल्यास, व्यक्तीला/व्यक्तींना प्राप्त होईल त्या व्यक्तीचे/व्यक्तींची नावे, पत्ते, नाते व वये | प्रत्येक सदस्याला देय असेल अशी उपदानाची रक्कम किंवा त्याचा हिस्सा** |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

*उपदानाच्या संपूर्ण रकमेचा समावेश होईल अशा प्रकारे हा स्तंभ भरावा.

**या स्तंभामध्ये दर्शविलेल्या उपदानाच्या रकमेत/हिश्श्यात मूळ नामनिर्देशित सदस्याला/सदस्यांना देय असलेल्या संपूर्ण रकमेचा/हिश्श्याचा समावेश असला पाहिजे.

या नामनिर्देशनामुळे, मी यापूर्वी दिनांक ..... रोजी केलेले नामनिर्देशन रद्द ठरले आहे.

